cmyk

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६८ | मंगळवार, दि.१४ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणासाठी पुन्हा संघर्ष

ठाणे : नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देण्यासाठी कोकण सागरी किनारपट्टीवर पुन्हा संघर्षाची हाक देण्यात आली आहे. ठाणे, रायगड जिल्ह्यातील गावागावांच्या वेशींवर यासंदर्भातील अल्टिमेटम सरकारला देण्यात आलेला आहे. मुख्यमंत्र्यांनी लोकप्रतिनिधींच्या झालेल्या बैठकीत दिलेला शब्द लक्षात घेता भूमिपुत्रांनी सरकारला काही दिवसांचा अवधी दिला आहे. मात्र आता निवडणुकांचा कालखंड जवळ येत असल्याने भाजपाला विमानतळाच्या नामकरण प्रश्नी कोंडीत पकडण्यासाठी भूमिपूत्र नवीन संघर्ष उभा करत आहेत. गावागावांच्या वेशींवर झळकत असलेले होर्डिंग्स चर्चेत आले असल्याचे चित्र सागरी किनारपट्टीवरील गावांमध्ये दिसून येत आहेत.

### ऐन दिवाळीत 'या' शहरात बरसणार मुसळधार सरी

पुणे: पुणे वेधशाळेने अधिकृतपणे मान्सून परतीला लागल्याची घोषणा केली आहे. मान्सूनच्या परतीची सीमारेषा सोमवारी स्पष्ट झाली. १४ ऑक्टोबर रोजी सोलापूर, सांगली, धाराशिव, लातूर, नांदेड, वाशिम, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. १५ ऑक्टोबर रोजी पावसाची व्याप्ती राज्यात वाढण्याची शक्यता असून, उत्तर कोकणातील पालघर, ठाणे, रायगड, मुंबई तसेच मध्य महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, नाशिक, जळगाव जिल्ह्ये वगळता राज्यातील उर्वरीत सर्व जिल्ह्यात अशाच स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. १६ ऑक्टोबर रोजी कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि त्या लगतच्या उत्तर विदर्भातील काही जिल्ह्यात वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर मान्सूनची तीव्रता कमी होऊन १७ ऑक्टोबर रोजी पालघर आणि नाशिक जिल्ह्यात वादळी पावसाची शक्यता आहे.

### राज ठाकरे काँग्रेससोबत या राऊतांच्या वक्तव्याने नाराजी

मुंबई : महापालिका निवडणुकीत एकत्र येण्याबाबत ठाकरे बंधूंमध्ये एकवाक्यता दिसत असली तरी मनसेला महाविकास आघाडीत असणार की नाही याबाबत अजूनही स्पष्टता नसताना खा. संजय राऊत यांनी सोमवारी स्वत: राज ठाकरे हे महाविकास आघाडीतील एक मोठा घटक असलेल्या काँग्रेसला सोबत घेण्यास अनुकूल असल्याचे वक्तव्य केल्याने काही काळ गोंधळ उडाला होता. राऊत यांच्या वक्तव्याबाबत मनसेने तीव्र नाराजी व्यक्त केली. तर काँग्रेसनेही अजून याबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले.

### निवडणूक आयोग भाजपच्या कार्यालयातून चालते–कडू

अमरावती: निवडणूक आयोग भाजपच्या कार्यालयातून चालत असल्याची टीका प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी केली आहे. काँग्रेस इतर राज्यात मराठी विषय घेऊन जाऊ शकत नाही. भाजपला बिहारपेक्षा मुंबई हवी आहे. भाजप काँग्रेसला बिहार देऊ शकते आणि मुंबई ताब्यात घेऊ शकते. ईव्हीएमचा प्रताप दाखवू शकते असे मत बच्चू कडू यांनी व्यक्त केले. ईव्हीएम मशीन काँग्रेसने आणली नसती तर हे पाप नसते आले, त्यांनी चूक केली. ईव्हीएम मशीन ठेवा पण बॅलेट पेपर प्रमाणे. आम्हाला सगळी माहिती द्या. मोदीजी रामचंद्राचे भक्त असतील तर त्यावर आमचे नाव आणि क्रमांक पण असेल असे ते म्हणाले.

# खतांच्या किंमती जैसे थे राहणार

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची ग्वाही




**दिल्ली । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने जागतिक खतांच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीचा भार भारतीय शेतकऱ्यांवर पडणार नाही याची काळजी घेतली आहे. खतांसाठी मोठ्या प्रमाणात सरकारी अनुदान देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना युरियाची एक पिशवी फक्त २६६ रुपयांना आणि डीएपी (डाय–अमोनियम फॉस्फेट) १,३५० रुपयांना उपलब्ध आहे. तसेच प्रमुख पिकांसाठी किमान आधारभूत किमतीत वाढ केली आहे, असे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले. दिल्लीतील आयोजित एका कार्यक्रमात श्री. चौहान बोलत होते. ते म्हणाले, की जिथे पंतप्रधान मोदींनी भारताच्या कृषी आणि संबंधित क्षेत्रांसाठी परिवर्तनकारी उपक्रमांची मालिका सुरू केली. कृषी यंत्रसामग्रीवरील जीएसटीमध्ये कपात केल्याने देशभरातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक उपकरणे अधिक परवडणारी झाली आहेत. केंद्र सरकारने प्रमुख पिकांसाठी किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) लक्षणीय वाढ केली आहे. गव्हासाठी प्रति क्विंटल १६० रुपये, हरभऱ्यासाठी २०० रुपये किंवा त्याहून अधिक, मसूरसाठी ३०० रुपये, मोहरीसाठी २५० रुपये आणि सूर्यफुलासाठी ६०० रुपये वाढ करण्यात आली आहे. ते म्हणाले, 'पीएम–किसान सन्मान निधी'अंतर्गत ३.९० लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आले आहेत. किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) योजनेद्वारे, आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये १० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे कर्ज वितरित करण्यात आले आणि त्याबरोबरच १.६२ लाख कोटी रुपयांचे व्याज अनुदान देण्यात आले. 'पंतप्रधान पीकविमा योजने'च्या विमाधारक शेतकऱ्यांना १.८३ लाख कोटी रुपयांपेक्षा ▶▶ पान २ वर

# राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार

## आगामी निवडणुकांसाठी शरद पवारांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील राजकीय पक्षाना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले असून मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. एकीकडे प्रशासनाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांसाठी आरक्षण सोडत जाहीर होत असून दुसरीकडे राजकीय पक्षांच्या बैठका आणि रणनीती सुरू आहे. तसेच, महाविकास आघाडी आणि महायुती होणार की नाही, यावरही मंथन सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत महत्त्वाची घोषणा करण्यात आली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार असल्याचे शरद पवारांनी जाहीर केले आहे.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस



शरद पवार गटाची एक बैठक मुंबईत झाली. बैठकीला पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, विधीमंडळ पक्षनेते जयंत पाटील, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे, खा. निलेश लंके, यांच्यासह पक्षाचे सर्व खासदार, आमदार व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढवण्याबाबत महाविकास आघाडीचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील. आघाडीच्या नेत्यांची बैठक होईल ▶▶ पान २ वर

# दोन टक्के काढून घेणाऱ्यांना टक्क्यातही ठेवणार नाही

## धनंजय मुंडेंचा मनोज जरांगेवर हल्लाबोल





**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**वंजारी समाजाला अनुसूचित जमाती मधील आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी पाथर्डी–शेवगाव परिसरात युवकांचे उपोषण सुरू असताना माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडे यांनी फोनवरून आंदोलकांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते ॲड. प्रतापराव ढाकणे यांच्या उपस्थितीत झालेल्या या संभाषणात मुंडे यांनी मराठा** ▶▶ पान २ वर

# बीडच्या वैष्णोदेवी नर्सिंग कॉलेजसह राज्यातील आकरा कॉलेजवर कारवाईचे आदेश

**बीड–मुंबई । प्रतिनिधी**

**शैक्षणिक पात्रता नसताना नर्सिंगच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देऊन शासकीय नियम डावलून प्रवेश देणाऱ्या बीड येथील वैष्णव देवी माता नर्सिंग कॉलेज सह राज्यातील ११ नर्सिंग कॉलेजच्या चौकशी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.**

गेल्या पाच वर्षात त्यांनी दिलेल्या प्रवेशाची पडताळणी करण्याचे देखील दिंश न्यायालयाने सक्षम प्राधिकाऱ्याला दिले आहेत या संदर्भात मुंबई उच्च



न्यायालयामध्ये दाखल याचिकेतील ९० जनापैकी याचिका करणाऱ्या पहिल्या वर्षाच्या २२ विद्यार्थ्यांना त्यांचे एक वर्ष वाया गेल्याबद्दल प्रत्येकी एक लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने या संस्थांना दिले आहेत बीड येथील वैष्णवी देवी माता नर्सिंग कॉलेज सोबतच नूतन स्कूल ऑफ नर्सिंग मुरुड डॉक्टर कुल्लोली इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सांगली रहमान कॉलेज ऑफ नर्सिंग अमरावती डॉक्टर एम आय मोमीन इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग कोल्हापूर फलटण एज्युकेशन सोसायटी सातारा, देवरुख इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग रत्नागिरी कोहिनूर इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग लातूर फातिमा कॉलेज ऑफ नर्सिंग अमरावती कोहिनूर आर जी एन एम नर्सिंग ▶▶ पान २ वर

# बोर्डाच्या परीक्षा जाहीर

## बारावीची १० तर दहावीची २० फेब्रुवारीला

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी–मार्च २६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षांच्या तारखांच वेळापत्रक जारी करण्यात आले आहे.

इयत्ता १२ वीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होऊन १८ मार्च २६ पर्यंत चालणार आहे, तर इयत्ता १० वीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २६ पर्यंत चालणार असल्याची माहिती मंडळाकडून देण्यात आली. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा आयोजित केल्या जाणार आहेत. बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान होणार असून एनएसक्यूएफ अंतर्गत व्यावसायिक ▶▶ पान २ वर

# पत्नीच्या जाचाला कंटाळून पतीची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

आजपर्यंत पती आणि सासरच्या जाचाला कंटाळून विवाहित महिलेने आत्महत्या केल्याच्या घटना पहिल्या आणि ऐकल्या असतील पण गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सासरच्या मंडळींना कंटाळून एका तरुणाने गळफास घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी, तरुणाने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीवरुन तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये तीन जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

भागवत अंकुश राठोड असं आत्महत्या केलेल्या तरुणाचं नाव असून ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याचे वैफल्य बाळगुन बबन दुधाळ यांनी जीवन संपवले

## शिरूर तालुक्यातील पाडळी येथील घटना

**शिरूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण दिल्याचा जी.आर.जाहीर केल्याने ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याचे सातत्यपूर्ण वैफल्य बाळगून शिरूर तालुक्यातील पाडळी येथील बबन दुधाळ या पित्याने राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची सोमवारी सकाळी उघडकीस आली आहे. मुलगा कृष्ण बबन दुधाळ यांनी दिलेल्या माहितीवरून शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे.



शिरूर कासार तालुक्यातील पाडळी या गावचे रहिवासी असलेले बबन तुळशीराम दुधाळ (६०) हे गेल्या काही दिवसापासून मराठा समाजाला हैदराबाद गॅजेट नुसार ओबीसी मध्ये आरक्षण दिल्यामुळे ओबीसी बांधवांवरती अन्याय झाला आहे. ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याचे वैफल्य बाळगून घरी याविषयी सातत्याने चर्चा करत असत. बबन दुधाळ यांचा मोठा मुलगा सावता ▶▶ पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये बोनस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तथा एसटीच्या सुमारे ८५ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवार दि. १३ ऑक्टोबर रोजी जाहीर केला. तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीचा फरक देण्यासाठी महामंडळाला सरकारकडून ६५ कोटी रुपये देण्याचे आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार असल्याचेही शिंदे यांनी घोषित केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत सोमवारी सह्याद्री अतिथीगृह येथे ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३९.५० क्विंटल | २,१७६ | २,७१० | २,४१६ |
| ज्वारी/हायब्रिड :१०८.५० क्विंटल | २,००० | ३,२५१ | २,४८७ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: १६५.५० क्विंटल | १,९०० | २,७९० | २,५४८ |
| मुग: ७.०० क्विंटल | २,५०० | ४,५०० | ३,४८० |
| सोयाबीन: ४०३.०० क्विंटल | ३,४२५ | ३,९१० | ३,७४६ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,१३१ | ५,१३१ | ५,१३१ |

# समता परिषद व सकल ओबीसी समाजाच्या एल्गार महासभेस उपस्थित राहणार–धनंजय मुंडे

**परळी वै.। प्रतिनिधी**

**बीड शहरात येत्या १७ ऑक्टोबर (शुक्रवार) रोजी समता परिषदेचे संस्थापक तथा ज्येष्ठ नेते मंत्री, छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या महा एल्गार सभेचे निमंत्रण मिळाले असून, आपण या एल्गार महासभेस उपस्थित राहणार असल्याचे माजी मंत्री तथा ओबीसी नेते धनंजय मुंडे यांनी परळी येथे पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.**

समता परिषदेचे नेते तथा कार्यक्रमाचे आयोजक ॲड. सुभाष राऊत यांनी परळी येथे आपली भेट घेऊन सभेचे निमंत्रण दिले असून, मंत्री छगन भुजबळ यांनी देखील दूरध्वनीवरून संपर्क साधत या सभेस उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले



असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान मी मागील अनेक वर्षांपासून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या राज्याच्या सर्वोच्च सभागृहात व रस्त्यावरील लढाईत लढलो आहे. त्याचबरोबर बंजारा समाज, धनगर समाज, मुस्लिम समाज बांधवांच्या आरक्षणाच्या लढाईत सहभागी झालेलो आहे. त्यामुळे ▶▶ पान २ वर

# मतदार यादी गैरव्यवहार आरोपांची एसआयटी चौकशी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान बेंगळुरू सेंट्रल मतदारसंघात मोठ्या प्रमाणात मतदार यादीत फेरफार झाल्याचा आरोप लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला होता. या आरोपांची विशेष तपास पथक (एसआयटी) चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका सोमवारी (दि. १३) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान बेंगळुरू सेंट्रल मतदारसंघात मोठ्या प्रमाणात मतदार यादीत फेरफार झाल्या प्रकरणी विशेष तपास पथक (एसआयटी) चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका रोहित पांडे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर या प्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठपुरावा करावा, अशी सूचना न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने केली. यावर याचिकाकर्त्याच्या वकिलांनी उत्तर दिले की केंद्रीय निवडणूक आयोगासमोर आधीच निवेदन सादर केले गेले आहे, ज्याने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. यावर खंडपीठाने स्पष्ट केले की, याचिकाकर्ता ▶▶ पान २ वर

### तातडीने दखल घेण्याची करण्यात आली होती मागणी

याचिकेत राहुल गांधी यांच्या ७ ऑगस्टच्या पत्रकार परिषदेचा उल्लेख करण्यात आला आहे. राहुल गांधी यांनी बेंगळुरू मध्य लोकसभा मतदारसंघातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघात कथित मतदार यादी फेरफारचा मुद्दा उपस्थित केला होता. याचिकाकर्त्याने असा दावा केला आहे की, त्यांनी विरोधी पक्षनेत्याने उपस्थित केलेल्या आरोपांची स्वतंत्रपणे पडताळणी केली आहे. हे आरोप कायदेशीर मतांचे मूल्य कमकुवत करण्याचा आणि विकृत करण्याचा पद्धतशीर प्रयत्न असल्याचे सिद्ध करण्यासाठी त्यांना प्रथमदर्शनी पुरेसे पुरावे आढळले आहेत. ज्यामुळे मोठ्या सार्वजनिक हितासाठी या माननीय न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे.'', अशी मागणी याचिकेतून करण्यता आली आहे.

cmyk

अग्रलेख

# शेतकरी सुद्धा आत्मनिर्भर झाला पाहिजे

'आत्मनिर्भर भारत' या एका तत्त्वाच्या आधारे जर नरेंद्र मोदी सरकारचा कारभार सुरू असेल तर देशातील शेतकऱ्यालासुद्धा आत्मनिर्भर करण्याची जबाबदारी मोदी सरकारने पार पाडायला हवी. अद्यापही कृषिप्रधान भारत देश अनेक कृषी उत्पादने आयात करतो त्यासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय निधी चलन वापरला जातो. हे जर कमी करायचे असेल तर देशाची गरज भागवणारे कृषी उत्पादन देशातच निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. सरकारने गेल्या ११ वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर केलेल्या सर्वच योजनांमध्ये आत्मनिर्भरता हा मध्यवर्ती मुद्दा असला तरी संपूर्णपणे परिणामकारक रित्या अमलात आलेला नाही हे वास्तवही स्वीकारावे लागते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात एका कृषी संशोधन संस्थेच्या कार्यक्रमात बोलताना देशातील शेतकऱ्यांसाठी नवीन दोन योजनांची घोषणा केली. 'शेतकरी धनधान्य योजना' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता योजना' या दोन योजनांचे यावर्षी सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये सुद्धा सुतोवाच करण्यात आले होते. नेहमीप्रमाणे योग्य प्रसंग साधून मोदी यांनी या दोन योजनांची घोषणा केली. या योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. या दोन योजना मिळून तब्बल ३६००० कोटी रुपये वापरले जाणार आहेत, म्हणजे तशी घोषणा तरी करण्यात आली आहे. पंतप्रधान या योजनांची घोषणा करत असतानाच महाराष्ट्रात गेल्याच आठवड्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी काही आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात आले आणि या पॅकेजप्रमाणे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदत जमा व्हायला सुरुवातही झाली आहे. ती मदत योग्य आहे की तुटपुंजी आहे हा चर्चेचा विषय असला तरी किमान शेतकऱ्यांना दिलासा देण्यास सुरुवात झाली आहे हेसुद्धा कमी नाही. आणखी आठवड्याभरातच दीपोत्सवाला सुरुवात होणार असल्याने ही दिवाळी बळीराजासाठी काही प्रमाणात का होईना गोड होईल, असे संकेत यानिमित्ताने मिळायला हरकत नाही. नरेंद्र मोदी यांनी ज्या दोन योजना जाहीर केल्या आहेत त्यापैकी एका योजनेच्या नावामध्ये शेतकरी कृषी धनधान्य असे शब्द आहेत म्हणजेच धान्याच्या उत्पादनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या पदरी धन पडावे आणि तो समृद्ध व्हावा अशी अपेक्षा या योजनेच्या नावातून समोर येऊ शकते. दुसऱ्या योजनेत डाळींच्या म्हणजेच कडधान्यांच्या उत्पादनामध्ये आत्मनिर्भरता हा विषय हाताळण्यात आला आहे. या योजनांच्या माध्यमातून देशातील काही जिल्ह्यांची निवड करून त्या ठिकाणी या योजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचा विचार करता प्रासंगिक पातळीवर निसर्गाने जो बळीराजाला त्रास दिला आहे त्यातून शेतकर्याला बाहेर काढण्यासाठी ही आर्थिक मदत आहे. तर नरेंद्र मोदी यांनी ज्या योजना घोषित केल्या आहेत त्यामध्ये चिरंतन पद्धतीने शेतकरी समृद्ध व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. पण सध्या बळीराजाची परिस्थिती खूपच लक्षणीय किंवा चांगली आहे असे म्हणता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा प्रथम सत्तेवर आले तेव्हा त्यांनी २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले जाईल अशी घोषणा केली होती. त्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या हाती तिसऱ्यांदा सत्ता दिल्यानंतरही अद्याप शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही हे मान्य करावे लागते. भारतीय शेती अद्यापही दुर्दैवाने बहुतांश प्रमाणात पावसावर अवलंबून असल्याने आणि जलसिंचनाच्या सोयी १००% प्रमाणात उपलब्ध झाल्या नसल्याने कमी झालेला पाऊस किंवा जास्त झालेला पाऊससुद्धा बळीराजाचे संपूर्ण वेळापत्रक विसकटून टाकतो. एवढेच नाही तर त्याचे आर्थिक नियोजनही बिघडवून टाकतो. महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि कृषिप्रधान राज्याप्रमाणे इतर काही राज्यांमध्ये सुद्धा पावसाने जो धुमाकूळ घातला त्यामुळे कृषी क्षेत्राचे वेळापत्रक आणि आर्थिक नियोजन पूर्णपणे बदलून जाणार आहे. तत्कालीन आर्थिक मदत योजनांची घोषणा करून मलमपट्टी केली जात असली तरी अशा प्रकारच्या दुष्काळी किंवा अवकाळी परिस्थितीमधून बळीराजाला सावरण्याचे कायमस्वरूपी बळ देण्याची गरज आहे. नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या दोन ताज्या योजना असोत किंवा गेल्या अकरा वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर केलेल्या विविध योजना असोत त्या सर्वांचा एकत्रित परिणाम साधायचा असेल तर या सर्व योजना गंभीरपणे अमलात आणाव्या लागणार आहेत. अर्थात, काही का असेना येत्या आठवड्यात सुरू होणारा दीपोत्सव असो किंवा त्यानंतरच्या कालावधीत येणारी प्रत्येक दिवाळी किंवा इतर सण उत्सव असोत, हा प्रत्येक उत्सवच देशातील बळीराजाला गोडी देणारा ठरेल अशा प्रकारचे गंभीर प्रयत्न केंद्रीय पातळीवर आणि महाराष्ट्र राज्य पातळीवरसुद्धा होणे गरजेचे आहे.

## मागण्या मान्य झाल्यामुळे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सावंत यांचे उपोषण मागे



**बीड । प्रतिनिधी**

**शिरूर (का.) तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा फुलसांगवी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधाकर सावंत यांना सेवानिवृत्तीचे लाभ मिळावेत यासाठी सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेऊन त्यांना रजा रोखीकरण आणि गट विमा आदी लाभ देण्यात आल्यामुळे त्यांनी रात्री उशिरा आपले उपोषण मागे घेतले.**

दरम्यान या उपोषणाची दखल घेऊन मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, लेखाधिकारी विकास ढोले, आरसूळ यांनी उपोषण स्थळी भेट दिली. वित्त विभाग आणि शिक्षण विभागाने तात्काळ दखल घेऊन सेवानिवृत्तीचे लाभ देण्याचे पत्र सोमवारी दिले. बीड जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ यांनी या उपोषणाला भेट देऊन लाभ देण्याचे आश्वासन दिले. रात्री ८.३० वाजता शिक्षणाधिकारी यांनी रजा रोखीकरण तात्काळ देण्याचे मंजुरीचे आदेश दिले. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे कार्यालय अधीक्षक रंगनाथ राऊत, कनिष्ठ प्रशासनाधिकारी जोशी यांच्या उपस्थितीत सदर पत्र दिल्यानंतर सावंत यांनी आपले उपोषण मागे घेतले.यावेळी अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी गौतम चोपडे, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी पंडित गोपाळघरे, मुख्याध्यापक कांतीलाल लाड, खतीब सर, श्याम घाडगे सर, बाळासाहेब शिंदे, मुख्याध्यापक अरविंद राऊत, आदिनाथ सवाशे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण खेत्रे, सेवानिवृत्ती इंजि. भोरे, पत्रकार नारायण नागरे आदींची उपस्थिती होते.



## गेवराई पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारीपदी विठ्ठल राठोड यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदी मजलगावचे शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल नामदेव राठोड यांची प्रभारी गटशिक्षण अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी शुक्रवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिले आहेत. दरम्यान विठ्ठल राठोड यांनी सोमवारी आपली पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.**

गेवराई पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदावर धनंजय शिंदे काम पहात होते. गेवराईचे लोकप्रतिनिधींच्या शिफारशीनुसार आणि राठोड यांच्या विनंतीनुसार त्यांच्याकडे कार्यभार देण्यात आला आहे. गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर राठोड यांचा अधिकारी, शिक्षक संघटना आणि शिक्षकांनी स्वागत केले. देण्यात आला होता. मात्र अवघ्या दिड महिन्याच्या कालावधीत नांदुरकर हे रजेवर गेल्यामुळे गिरी यांच्याकडे प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार देण्यात आला आहे. राठोड यांनी यापूर्वी काही काळ गेवराई गटशिक्षण अधिकारी म्हणून काम पाहिले आहे.

## बीडमध्ये वंचितांची निवडणूक रणनिती स्पष्ट नगराध्यक्ष ते जिल्हा परिषद अध्यक्ष पदापर्यंत विजयी उमेदवार देणार

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने तयारीला सुरुवात केली असून, नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सदस्य अशा सर्वच पदांवर आपले उमेदवार रिंगणात उतरवण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे. बीड येथील शासकीय विश्रामगृहात १२ ऑक्टोबर रोजी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही रणनिती ठरवण्यात आली.**



या बैठकीत जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सांगितले की, ''सामान्य जनतेच्या आशा-आकांक्षांना दिशा देण्यासाठी आणि सत्तेत प्रभावी सहभाग सुनिश्चित करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी येणाऱ्या निवडणुका मोठ्या ताकदीने लढवणार आहे. सर्वच स्तरांवर पक्षाचे उमेदवार उतरवले जातील आणि सत्ताधाऱ्यांना कडवे आव्हान दिले जाईल.'' बैठकीस पक्षाचे महासचिव खंडू जाधव, शहराध्यक्ष लखन जोगदंड, उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, तसेच ज्ञानेश्वर कवठेकर, पुष्पाताई तुरुकुमारे, अनितातार्इ चक्रे, राणी बचुटे, मिलिंद सरपते यांच्यासह जिल्ह्यातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान आगामी निवडणुकांबाबत विस्तृत चर्चा झाली. विशेषतः बीड नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांमधील सत्तांतरासाठी पक्षाने ठोस कार्यक्रम आखण्याचा निर्णय घेतला. लवकरच सर्व मतदारसंघांमध्ये पक्षप्रमुखांची बैठक घेऊन उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार असल्याचे संकेतही यावेळी देण्यात आले. वंचित बहुजन आघाडी ही केवळ निवडणूक लढवण्यासाठी नाही तर राजकीय परिवर्तन घडवण्यासाठी सज्ज आहे, असा ठाम विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. समाजातील वंचित, शोषित घटकांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ही निवडणूक लढवली जाणार असून, जनतेच्या आशीर्वादाने विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वासही यावेळी बोलून दाखवण्यात आला.

## पान ६ वरून...

### लोकशाहीच्या चौथ्या

संधी यांसारख्या प्रश्नांवर नेहमीच आवाज उठवितात. रस्ते, पाणी, पथदिवे आणि सर्वांगिण विकास अशा महत्वपुर्ण गोष्टींवर काम करणारा लोकप्रतिनिधी म्हणून खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या व्यक्तीची गरज भासत होती, आणि त्यामुळेच मुडेगांवकर यांच्या नावाला जनतेत चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. राजकारण करत असताना शिवसेनेची शिकवण ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारांशी बांधील राहून जनते सोबत असलेला त्यांचा संपर्क,त्यांच्या महत्वपुर्ण प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका, वेळोवेळी केलेला पाठपुरावाआणि कार्यक्षम नेतृत्व यामुळे गजानन मुडेगांवकर नगराध्यक्ष पदासाठीच्या निवडणुकीत चर्चेचा विषय ठरत आहे. मुडेगावकर यांनी अनेक वर्षे शहरप्रमुख म्हणुन शहरात संघटन केले आहे तर स्वा.रा.ती रुग्णालय अभ्यागत मंडळावर असल्याने अनेक नागरिकांच्या अडचणी सोडवल्या आहेत तसेच कामगार संघटनेचा पाठिंबा असल्याने त्यांचा शहरातील सर्वसामान्य ते ज्येष्ठां पर्यंतचा जन संपर्क दांडगा मानला जात आहे.स्थानिक नागरिक त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शवत, आम्हाला काम करणारा नेता हवा, केवळ प्रसिद्धीचा हव्यास नसलेला नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. राजकारणात नव्या दमाच्या आणि स्वच्छ प्रतिमेच्या लोकांना संधी देण्याची वेळ आली आहे, असे मतही काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त करून गजानन मुडेगांवकर यांचे स्वागत केले आहे. आता त्यांच्या उमेदवारी जाहीर होण्याच्या प्रक्रिये कडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

----------

### इंडियन मेडिकल असोसिएशनच्या

अनेक डॉक्टर्स या स्पर्धांची वाट बघून असतात, या स्पर्धा म्हणजे विविध कलागुणांचा व उत्सवाचा मेळा असतो असे वक्तव्य नियोजित अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी केले. डॉ.राजेश इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली डॉक्टर्स करिता या सांस्कृतिक स्पर्धा सातत्याने होत आहेत. या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी अनेक डॉक्टर उत्सुक असतातआणी डॉ.इंगोले हे मिळालेल्या पदाला न्याय देणारे व्यक्तिमत्व आहे असे वक्तव्य सुनियोजित डॉ.मंजुषा गिरी यांनी व्यक्त केले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राज्य समिती सदस्य डॉ.गीतांजली शर्मा, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.मोहिनी गानू, डॉ.आशा शितोळे, डॉ.राजन जोशी, डॉ.माया भालेराव, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.राजश्री सावंत, डॉ.कांचन मदार, डॉ.प्रज्ञा किनगावकर विनोद शेलार, डॉ.श्रुती जाधव, डॉ.अभिजीत जाधवर, डॉ.प्रफुल्ल जटाळे, डॉ.निलेश नागरगोजे, डॉ.सोनल बोबडे, डॉ.निलेश पुरी, डॉ.रोहिणी बडवे, डॉ.स्नेहलता कुरिस व डॉ.तुकाराम मुंढे हे परिश्रम घेत आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभासद डॉक्टर्सनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी केले आहे.

----------

### डॉ.संतोष कदम यांचा

मा.मंगलाजी लोखंडे (सेवानिवृत्त क्रीडा शिक्षिका), मा.डॉ. विवेकजी मुळे (मुळे हॉस्पिटल, अंबाजोगाई) मा.शिवकुमारजी निर्मळे (सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक) मा.रमणजी सोनवलकर (सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक) यांनी डॉ.संतोष कदम यांच्या प्रति शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. प्रशासकीय कामाच्या व्यस्ततेतून मा. दीपकजी वजाळे (उपजिल्हाधिकारी,अंबाजोगाई) यांनी भ्रमणध्वनी वरून डॉ.संतोष कदम यांना शुभेच्छा दिल्या.समारोहाचे संचालन - राहुल मोरे प्रास्ताविक - ॲडव्होकेट बाळासाहेब लोमटे तर शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख अतिथी, मनस्विनी महिला प्रकल्प, तंत्रशुद्ध फोटोग्राफी व उपस्थितांचे सप्रेम आभार संयोजक - महेंद्र निकाळजे यांनी मानले. समारोह अतिशय उत्साहात संपन्न झाला यशस्वीतेसाठी सोहम योगा ग्रुपने तन-मन धनाचे योगदान दिले.

----------

### ओबीसी महाएल्गार

राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून ओबीसी समाज बांधव, भगिनींनी, युवक, युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

----------

### महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था

शुक्रवारी होत असलेल्या ओबीसी महाएल्गार सभेसाठी छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणाच्या प्रांगणात ५०,००० खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली असून मेळाव्यास येणाऱ्या प्रत्येक बंधू-भगिनींसाठी नाष्ट्याची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. बीड शहरामध्ये ठिकठिकाणी ''एकच पर्व ओबीसी सर्व!''असे घोषवाक्य असलेले झेंडे लावण्यात आले असून ठीकठिकाणी बॅनर्स आणि पोस्टर लावण्यात आले आहेत.

----------

## पान १ वरून...

### खतांच्या किंमती जैसे

जास्त भरपाई देण्यात आली. केंद्रीय मंत्र्यांनी पुनरुच्चार केला, की सरकार भारतीय शेतीला जागतिक मानकांवर आणण्यासाठी काम करत आहे आणि देशाला 'आत्मनिर्भरता' (स्वावलंबन) आणि 'विकसित भारता'कडे घेऊन जात आहे. त्यांनी नागरिकांना स्वदेशी स्वीकारण्याचे आणि देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले.

----------

### दोन टक्के काढून घेणाऱ्यांना

आरक्षण कार्यकर्ते मनोज जरांगे यांच्यावर नाव न घेता एका वाक्यात कठोर टीका केली. आमचे दोन टक्के काढून घेणारे म्हणणाऱ्यांना टक्क्यात सुद्धा ठेवणार नाही, असा सूचक इशारा देऊन धनंजय मुंडेंनी वंजारी समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला पूर्ण पाठिंबा जाहीर केला. या उपोषणाला भाजप नेते आणि अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच माजी खासदार सुजय विखे यांनी भेट दिली होती. त्यांनी आंदोलकांना १५ दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनानंतरही युवकांचे उपोषण सुरूच राहिले आहे. यानंतर ॲड. प्रतापराव ढाकणे यांनी उपोषणस्थळावर भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली आणि थेट धनंजय मुंडे यांना फोन लावला. युवकांच्या मागणीची माहिती देत ढाकणे यांनी मुंडे यांना ''आंदोलकांना समजावून सांगा,'' असे सांगितले आणि फोन माईकसमोर धरला. फोनवरून बोलताना धनंजय मुंडे यांनी वंजारी समाजाच्या लढ्याला ऐतिहासिक संदर्भ देत पाठिंबा दिला. ते म्हणाले, हैदराबाद गॅझेट निघाले नसते, तर आपण म्हणजेच वंजारी समाज, पाथर्डीमध्येच नाही, बऱ्याच ठिकाणी आणि इतर राज्यांमध्येही एसटीमध्ये आहोत हेच कळले नसते. आम्हाला अगोदरच माहिती होती की आपण एसटीमध्ये आहोत. कारण तेलंगणाच्या बॉर्डरजवळ परळी येते. लोकनेते गोपीनाथ मुंडे असल्यापासून सर्वांना माहिती आहे की, अनेक पाहुणे तिकडे एसटीमध्ये आहेत, तर आपण इकडे व्हीजे-एनटीमध्ये आहोत, असे धनंजय मुंडे म्हणाले.

----------

### राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या

आणि येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत धोरण ठरवले जाईल असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाच्या बैठकीत बोलताना स्पष्ट केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या तरुणान ५० टक्के तिकिटे दिली जातील असे सुतोवाच करताना, पक्षबांधणीसाठी भाकरी फिरवण्याचे संकेत शरद पवारांनी दिले. बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या दृष्टीने संघटनात्मक बांधणीसाठी आणि पुढील रणनीती ठरवण्याबाबत चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्थानिक पातळीवर आघाडी करावी की नाही याबाबत स्थानिक खासदार, आमदार व पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यात आली. उद्या महाविकास आघाडीचे नेते मतदारयादीतील गोंधळाबाबत राज्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे हेही या शिष्टमंडळात असणार आहेत. त्या भेटीनंतर आघाडीच्या नेत्यांची बैठक होणार असून, त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्राथमिक चर्चा होईल व धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. एकत्र लढायचे की नाही, याबाबत निर्णय झाल्यानंतर जिल्हानिहाय, महापालिका निहाय बैठका घेण्याचे निश्चित करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना आघाडीतील पक्षांमध्ये मतविभागणी होऊ नये यासाठी एकत्र लढण्याची आमची भूमिका असल्याचे स्पष्ट केले. मनसेच्या आघाडीतील सहभागाबाबत अद्याप कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

----------

### बोर्डाच्या परीक्षा

विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांसह प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन शुक्रवार २३ जानेवारी ते सोमवार ०९ फेब्रुवारी २६ पर्यंत आयोजित केले जाणार आहे. यात माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांचा देखील समावेश आहे. दहावीसाठीची प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा सोमवार २ फेब्रुवारी ते बुधवार १८ फेब्रुवारी २६ पर्यंत चालतील. यामध्ये शारीरिक शिक्षण, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांचा समावेश असेल. दरम्यान, शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यासाठी दोन्ही फेब्रुवारी-मार्च २६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षांच्या तारखा विचारात घेऊन कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले.

----------

### बीडच्या वैष्णोदेवी नर्सिंग कॉलेजसह

स्कूल लातूर या महाविद्यालया विरोधात न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती अश्विन बॉम्बे यांच्या खंडपीठाने हे नुकतेच आदेश काढले आहेत त्यामुळे या नर्सिंग कॉलेजची गेल्या पाच वर्षातील प्रवेश प्रक्रियेच्या चौकशी बरोबरच ज्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

----------

### एसटी कर्मचाऱ्यांना

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक पार पडली. यावेळी शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. तरीही एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली पाहिजे म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर एसटीला आर्थिकदृष्टया समृद्ध करणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी तत्वावर एसटीच्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. एसटीचे सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी सरकारने सुमारे ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच सन २०२०-२४ दरम्यानच्या वेतन वाढीतील फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतनासोबत देण्यात येणार असून, यासाठी सरकारने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत. त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली. या बैठकीला उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एस. टी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

----------

### ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याचे वैफल्य

बबन दुधाळ हा कोल्हापूर येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करत असून छोटा मुलगा कृष्णा बबन दुधाळ तालुक्यातील तागडगाव येथील कॉलेजमध्ये बीए च्या द्वितीय वर्ष मध्ये शिक्षण घेत आहे. मराठा समाज ओबीसी मध्ये घुसल्याने ओबीसी मध्ये मोठी स्पर्धा निर्माण होऊन माझ्या मुलांची भवितव्य धोक्यात आल्याचे सतत बोलत असत. ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याचे बाळगूनच त्यांनी रविवारच्या रात्री पाडळी येथील राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आपले जीवन संपवले आहे. सदरील घटना लक्षात आल्यानंतर शिरूर पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आली व पोलीस पंचनामा झाल्यानंतर शोकाकुल वातावरणामध्ये त्यांच्यावरती अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. सदरील घटनेची माहिती मयत बबन दुधाळ यांच्या मुलगा कृष्णा बबन दुधाळ यांनी दिलेल्या माहितीवरून शिरूर पोलीस स्टेशन मध्ये याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

------------

### पत्नीच्या जाचाला कंटाळून

त्याची आई सुनिता राठोड यांनी तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीनुसार भागवत राठोड याला पत्नी, सासरा आणि मामेसासरा हे मानसिक त्रास देत होते. त्यामुळे तो नैराश्यात होता असं म्हटलं आहे. त्यातूनच त्याने १ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चिठ्ठीही लिहून ठेवली, ज्यात होणाऱ्या त्रासाचा उल्लेख करण्यात आला आहे. मुलाच्या मृत्यूच्या दुःखातून सावरल्यानंतर भागवतच्या आईने पोलीस स्टेशनमध्ये ही तक्रार नोंदविली आहे. दरम्यान, याप्रकरणी त्याची पत्नी राणी राठोड, सासरा संतोष राठोड आणि मामेसासरा दत्ता राठोड यांच्या विरोधात तलवाडा पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.आजपर्यंत सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेच्या आत्महत्या या घटना ऐकल्या असतील पण हि पाहिलंच घटना बीड जिल्ह्यात घडली ती म्हणजे पत्नी सासरा मामासासरा यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या झाली .

--------------

### मतदार यादी गैरव्यवहार आरोपांची

निवडणूक आयोगासमोर हा विषय मांडू शकतो. वकिलांनी निवडणूक आयोगाला निर्णय घेण्यासाठी वेळमर्यादा निश्चित करण्याची मागणी केली असली तरी, खंडपीठाने असे कोणतेही निर्देश देण्यास नकार दिला. याचिकेत न्यायालयाच्या निर्देशांचे पालन होईपर्यंत आणि याद्यांचे स्वतंत्र ऑडिट पूर्ण होईपर्यंत मतदार यादीत पुढील सुधारणा किंवा अंतिमीकरण करू नये अशी मागणी करण्यता आली होती. याचिकाकर्त्याने मतदार यादीची तयारी, देखभाल आणि प्रकाशनात पारदर्शकता, जबाबदारी आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने बंधनकारक मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची आणि जारी करण्याची मागणी केली आहे. निवडणूक आयोगाला अर्थपूर्ण पडताळणी, ऑडिट आणि सार्वजनिक छाननी सक्षम करण्यासाठी सुलभ, मशीन-वाचनीय आणि ओसीआर-अनुपालन स्वरूपात मतदार यादी प्रकाशित करण्याचे निर्देश देण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. आम्ही याचिकाकर्त्याच्या वकिलाचे म्हणणे ऐकले आहे. जनहितार्थ दाखल केलेली ही याचिका आम्ही विचारात घेण्यास इच्छुक नाही. याचिकाकर्ता निवडणूक आयोगासमोर बाजू मांडू शकतो,'' असे खंडपीठाने आपल्या आदेशात म्हटले आहे.

--------

### समता परिषद व सकल ओबीसी समाजाच्या

ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या संरक्षणाच्या लढाईत देखील मी सहभागी होणार असून, सकल ओबीसी समाजाने एकजुटीने या महा एल्गार सभेस उपस्थित रहावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले असून, याविषयी अधिक न बोलता मी माझी सविस्तर भूमिका ओबीसी समाजाच्या महा एल्गार सभेतून मांडेन, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. यावेळी पदाधिकारी आदी उपस्थित होते. आपण कुणाच्याही विरोधात नाही, मात्र कुणाच्याही ताटातले हिस्कावले जाऊ नये, या मागणीच्या आपण पाठीशी असल्याचे देखील धनंजय मुंडे म्हणाले.

-----------

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



# रस्ते विकासाच्या नावाखाली हजारो वर्षे जुनी झाडे तोडून पर्यावरणाचा ऱ्हास



पाटोदा । प्रतिनिधी

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' या जगतगुरु तुकोबारायांचा अभंगा नुसार ''सजीवांचं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण केलं पाहिजे.'' विनोद गर्जे

बीड ते अहिल्यानगर (पाटोदा मार्गे)या रस्त्यावरील अतिशय पुरातन असणारे वड, पिंपळ,लिंब,निलगिरी तथा इतर मोठी मोठी वृक्ष जें आम्ही लहान पनापासून पाहत आलोयेत, ज्याचं वयं किमान १०० वर्षांपेक्षा जास्तच आहे. अशी डेरेदार झाडे जी सावली देत आहेत वं निसर्ग संवर्धन करण्यात अगदी पुढे आहेत.अशी प्रचंड मोठी झाडे रस्ता-रुंदीकरणाच्या नावाखाली अतिशय अमानुषपणे तोडताना आम्ही येता जाता पाहतोय.पण मुक्या आणि अंध व्यक्तीगत गुमान जावं लागतंय ही बाब प्रचंड दुःख देणारी आहे.

खुप वेदना होतायेत शासनाने खरंच याचा विचार केला पाहिजे. ही डेरेदार झाडे म्हणजे या मार्गाची ओळख होय. मागे काही दिवसांपूर्वी अगदी राज्य आणि केंद्र सरकार स्तरावर कितीतरी कोटी झाडे लावण्याचा उपक्रम खूप मोठया प्रमाणात पैसे खर्च करुन राबवला होता, पण दुर्दैव म्हणजे आज त्यातील किती झाडे जिवंत आहेत? याचा शोध घेतला तर नक्कीच घोर निराशा झाल्याशिवाय रहाणार नाहीं.अहो आपण झाडे लावत नाहीत, लावले तर त्यांची हिपाजत करत नाहीत आणि आपल्या पूर्वजानी लावलेली झाडे अगदी विकास, रस्ता, अद्योगिकरण, वसाहत,कारखाने किंवा इतर थोतांड कारण पुढं करुन तोडून विकत आहोत, ही बाब एक देशप्रेमी म्हणून खूप जिव्हारी लागतीये.

''आज अशी स्थिती आहे उगाचं कागदोपत्री झाडे लावण्यापेक्षा जी आहेत त्यांना जपल तरी खूप कमावली.''पण दुर्दैव म्हणजे ते सुद्धा होताना दिसतं नाही.

निसर्गावर केलेल्या अतिक्रमण आणि अत्याचार यामुळे निसर्गानें आपणास कायमच अनेक इशारे दिलेले आहेत. मागील काही वर्षात बऱ्याचदा पडलेले दुष्काळ, मागील महिन्यात झालेली अतिवृष्टी, अवेळी पडणारा पाऊस, भूकंप, महाप्रलंय आणि भूस्खलन यामुळे अतोनात जीवीतहानी तथा आर्थिक नुकसान होऊन देखील मानव ध्यानावर यायचं नावं घेत नाहीये.

विकास, रस्ते आणि आत्मनिर्भर भारत या स्वप्नाच्या नावाखाली अशी निसर्ग आणि तत्सम घटकांची हेळसांड करुन मानवीय जीवन सुखर होण्याऐवजी नक्कीच येणाऱ्या काळात अधिक अडचणीत येणार आहे. आणि हो

''एक भारतीय म्हणून हा असला विकास जो झाडे तोडून होणार असेल तर तो नाहीं झालेलाचं बरं आहे साहेब ''

जगातील अनेक विकसीत देशात अनेक मोठी झाडे रस्त्याच्या मध्यभागी आहेत, अनेक खेळाच्या मैदानाच्या मध्ये किंवा जवळपासं आपण पाहतो. ते निसर्ग आणि व्रक्ष यांना जीवापाड जपतात म्हणून समृद्ध आहेत आणि राहतील.आपण लाखो कोटी खर्च करुन, करोडो झाडाचे बळी घेऊन अनेक रस्ते केलेत. मान्य आहे, त्यामुळे दळणवळणाला गती मिळाली पण....वाहनानं मूळे होणारे प्रदूषण आटोक्यात आणणारे झाडे नष्ट झालेत.

भारतातील सगळेच मोठी शहरे जगातील अधिक प्रदूषित असणाऱ्या शहराच्या यादीत अग्रस्थानी आहेत यांचाचं अर्थ आपण विकास, रस्ते आणि उद्योगाचा नावाखाली निसर्ग तथा पर्यायी आरोग्य नष्ट करत आहोत.

--------

## थोडक्यात...

### शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाडेतत्त्वावर देण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी बीड शहरात योग्य इमारतीची आवश्यकता आहे. या वसतिगृहात सुमारे ७५ विद्यार्थिनींसाठी निवासाची सोय असणार आहे. त्यासाठी सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज अशी अंदाजे ७५०० चौ.फुट क्षेत्रफळाची इमारत आवश्यक असून, सदर इमारतीत पर्याप्त निवासखोल्या, भोजनगृह, कार्यालय, भांडारगृह, चौकीदार निवासस्थान, स्नानगृह, शौचालय तसेच सुरक्षा भिंत असणे अपेक्षित आहे. सदरप्रमाणे आवश्यक सोयी असलेली इमारत भाडेतत्त्वावर देण्याची तयारी असलेल्या इच्छुक इमारत मालकांनी आपला प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड येथे दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वरद लांडगेची चमकदार कामगिरी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



परळी येथील न्यू हायस्कूल शाळेचा विद्यार्थी चिरंजीव वरद श्रीराम लांडगे (इयत्ता आठवी) याने विभागीय जलतरण स्पर्धेत आपली चमकदार कामगिरी नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. फक्त पहिल्याच प्रयत्नात विभागीय विजेतेपद मिळवून वरदने राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी पात्रता मिळवली असून हा परळी तालुका व न्यू हायस्कूल शाळेसाठी अभिमानाचा क्षण ठरला असून आगामी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये तो आता बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. इयत्ता आठवीत शिकणारा वरद श्रीराम लांडगे या न्यू हायस्कूलच्या विद्यार्थ्याने पहिल्याच प्रयत्नात विभागीय जलतरण स्पर्धा जिंकली आणि तो आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. पहिल्याच प्रयत्नात राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेपर्यंत मजल मारणारा वरद हा न्यू हायस्कूल शाळेचा पहिलाच विद्यार्थी आहे. त्याने ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात उत्कृष्ट जलतरण कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले. त्याच्या अथक मेहनतीचे आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे हे यश मानले जात आहे या यशासाठी त्याला स्विमिंग कोच संजय भगत सर आणि शालेय क्रीडा शिक्षक नारायण वानखेडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### शिवसंग्राम स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढवणार

परळी । प्रतिनिधी



शिवसंग्राम पक्षाने परळी तालुक्यात येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपरिषद निवडणुका स्वबळावर लढविण्याचा निर्धार केला आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व परळी नगरपरिषदेच्या निवडणुका शिवसंग्राम पूर्ण ताकतीने लढणार आहे. या संदर्भात परळी तालुक्यातील पक्षाच्या कार्यकर्त्यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती शिवसंग्राम परळी तालुकाध्यक्ष कैलास नाईकवाडे पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

शिवसंग्राम पक्षाच्या वतीने दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे की, आगामी काळात परळी तालुक्यातील सर्वच जिल्हा परिषद गट पंचायत समितीचे गण व परळी नगरपरिषद निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढविण्यात येणार आहे. या निर्णयामागे शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांचे मार्गदर्शन असून, पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोंलगडे, बीड जिल्हा अध्यक्ष सुभाष जाधव, तसेच जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा राजकीय रणसंग्राम लढविण्यात येणार आहे. शिवसंग्राम पक्ष परळी तालुक्यातील सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी, शेतकरी, कामगार, युवक आणि महिलांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढा देत आला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही जनतेचा विश्वास संपादन करून शिवसंग्राम पक्ष स्वतःचे बळकट अस्तित्व दाखवेल.'' शिवसंग्राम पक्षाने यापूर्वीही परळी तालुक्यात समाजहिताच्या अनेक प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली असून, या निवडणुकांद्वारे पक्ष जनतेचा आवाज अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा निर्धार करीत करण्यात आला आहे. शिवसंग्राम चे परळी तालुका अध्यक्ष कैलास नाईकवाडे पाटील, शहर अध्यक्ष मुजीब पठाण, युवक तालुकाध्यक्ष राजु सय्यद, व युवक शहराध्यक्ष रहीम पठाण यांनी संयुक्तपणे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# तालखेड येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## सद्‌गुरू पपू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटलचा उपक्रम



**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने दादासाहेबांच्या आदेशानुसार सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर माजलगाव तालुक्यातील तालखेड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या शिबिराचे उदघाटन दिपप्रज्वलन व परब्रह्म भगवान श्री स्वामी समर्थ महाराज व धन्वंतरी पूजन करुन झाले. यावेळी डॉ मोहन गौरकर, डॉ कृष्णा खैरनार, डॉ शिल्पा मॅडम तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटर ची टीम, सरपंच गुलाबराव मोरे, शिवशंकर भंडारे, तालुका प्रतिनिधी योगेश कराड, अशोक सावंत, नवनाथ लाखे, संग्राम ठोंगे इत्यादी उपस्थित होते. यावेळी डॉ मोहन गौरकर यांनी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या शिबीराचे प्रास्ताविक शिवशंकर भंडारे यांनी केले. या वेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात नाडी परीक्षण, बीपी, शुगर, इसीजी, फिजिओथेरपी इत्यादी सेवा मोफत देण्यात आली.

# माजलगावात गोशाळेच्या वतीने माफक दरामध्ये दिवाळी फराळाची विक्री



माजलगाव । प्रतिनिधी

येथील स्वा.कमलाबाई मुंदडा गोशाळेच्यावतीने अल्पशा नफ्यावर माजलगावकरांसठी प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करून विक्री चालू करण्यात आली आहे.या दिवाळी फराळाच्या विक्रीतुन गोशाळेस आर्थिक मदत होऊन गायीच्या चाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागुन माजलगावकरांच्या हातुन सामाजिक कार्य घडावे हा मुख्य हेतू यामध्ये साध्या होवून गोशाळेची प्रगती होवी.

हा उपक्रम मागील ९ वर्षा पासून अविरतपणे चालू आहे.यातील खाद्यपदार्थ स्वादिष्ट व रुचकर असतात तसेच स्वच्छतेचे सर्व बाबी लक्षात घेऊन हे पदार्थ बनवतात. माजलगावकर या गोशाळाच्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी फराळ खरेदीसाठी गर्दी करतात.बाहेर गावावरून या दिवाळी फराळाची खरेदी कराण्यासाठी लोक येतात.हा जुना मोंढा,माजलगाव येथील गणपती मंदिर येथे स्टॉल दररोज सकाळी ९:०० ते रात्री ९:०० पर्यत चालू असतो. या दिवाळी फराळा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गोशाळा समिती व गोशाळाचे सेवेकरी करतात यामध्ये संभाजीनगर वरुन बैजूलाल लोहिया व प्रदिप रुद्रवार, विष्णूदास करवा,ब्रदी मानधने, भगवान लाटे, चंद्रकांत शिंदे हे विशेष कार्य करतात.

# आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त बीडमध्ये शपथ व अग्निशमन प्रात्यक्षिकाचे सादरीकरण



बीड । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय आपत्ती धोके निवारण दिनाचे औचित्य साधून, दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त शपथ ग्रहण समारंभाचे व अग्निशमन प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास हरिष धार्मिक, अपर जिल्हाधिकारी, बीड आणि शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बीड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, तसेच अग्निशमन पथक, नगरपरिषद बीड आणि बीड मुख्यालयातील अधिकारी, कर्मचारी व आपदा मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांना आपत्ती धोके निवारणासंदर्भात शपथ देण्यात आली. त्यानंतर, या दिनानिमित्त जनजागृतीपर सादरीकरण करण्यात आले.कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग म्हणून, किशोर जाधव, अग्निशमन अधिकारी, नगरपरिषद बीड यांनी जिल्हास्तरीय शोध व बचाव पथकामार्फत अग्निशमन उपकरणे चालविण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकाद्वारे उपस्थितांना आपत्तीच्या प्रसंगी तात्काळ प्रतिसाद कसा द्यावा, तसेच कोणती खबरदारी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी, प्रशांत वाघमारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# चुकीच्या पद्धतीने केलेली प्रभाग फेररचना व मतदार याद्यामधील नावांची अनाधिकृतपणे केलेली अदलाबदल तात्काळ दुरूस्त करावी- राजकिशोर मोदी



अंबाजोगाई । प्रतिनिधी

नुकतीच अंबाजोगाई शहरातील प्रभागाची फेररचना नगर परिषद प्रशासनाच्या वतीने जाहिर करण्यात आली आहे. या प्रभागाच्या फेररचनेनुसार तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये मतदाराच्या नावांची बहुतांश ठिकाणी आदलाबदल करण्यात आली आहे. प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेली मतदारांची आदलाबदल ही त्या त्या मतदारांना सुद्धा अमान्य असल्याची तक्रार मतदार करत आहेत. त्यामुळे जाहीर करण्यात आलेली प्रभागरचना व प्रारूप मतदार याद्या या तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री , मुख्य निवडणूक आयुक्त, जिल्हाधिकारी बीड, पालकमंत्री बीड, तहसीलदार अंबाजोगाई तसेच मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई यांना देण्यात आले आहे. सदर निवेदन सादर करताना यावेळी राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे, मनोज लखेरा, महादेव आदमाने, धम्मा सरवदे, हाजी महमूद ,सुनील वाघाळकर , कचरू सारडा, मोईन शेख, अकबर पठाण यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्या वतीने तहसीलदार विलास तरंगे तसेच मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांनी निवेदन स्वीकारले.

उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात अंबाजोगाई नगर परिषद प्रशासनाने राजकीय दबावापोटी व त्यांच्या सोयीनुसार प्रभाग रचना व मतदार याद्या तयार केलेल्या दिसून येत आहेत. प्रत्येक यादीमध्ये किमान २०० ते ५०० नावांची अफरातफर किंवा आदलाबदल केली आहे. शहरातील सर्वात मोठा गणल्या जाणारा प्रभाग क्रमांक १५ यामध्ये ४८०० मतदार दाखवले आहेत. तर दोन सदस्य असलेल्या प्रभागात ५८०० पेक्षा जास्त मतदार सामील केले आहेत. याबाबत मतदारांत संभ्रम निर्माण होत आहे. अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली येऊन काम करत असल्याची चर्चा दबक्या आवाजात नागरिकांतुन केल्या जात आहे. त्याचबरोबर काही प्रभागात ग्रामीण भागातील तथा शहराबाहेरील जसे की जोगाई वाडी व अन्य ठिकाणची ३००० ते ४००० नावे समाविष्ट केल्याचे आढळुन येत आहे. ती नावे वगळण्यात यावीत अशी मागणी देखील राजकिशोर मोदी यांनी आपल्या निवेदनातून केली आहे.

दोन सदस्य असलेल्या प्रभागात (प्रभाग क्र. १२) ५८४९, (प्रभाग क्र. १०) ५५३०, (प्रभाग क्र. ४) ५४१२, (प्रभाग क्र. १)५३०३ असे मतदार दर्शविले आहेत. तर तीन सदस्य असणाऱ्या प्रभागात केवळ (प्रभाग क्र. १५) ४८७६ मतदार दर्शविले आहेत. त्यावरून असे निर्देशित होते की, हेतूपुरस्कर रित्या ज्या प्रभागात सत्ताधाऱ्यांना विरोध होणार आहे अशा प्रभागात कमी मतदार दर्शविले आहेत. तर विरोधकांच्या प्रभागात जास्तीत-जास्त मतदार नोंदविण्याचा प्रकार घडविण्यात आलेला असल्याचे दिलेल्या निवेदनात राजकिशोर मोदी यांनी नमूद केले आहे. तेंव्हा मतदार संख्येत केलेली ही असमानता आश्चर्य जनक असून, त्यावर मा. निवडणुक निर्णय अधिकारी साहेबांनी गांभीर्याने विचार करावा. असे न झाल्यास पुढील ८ दिवसात अमरण उपोषण किंवा अन्य कायदेशीर मार्गाचा पर्याय निवडावा लागेल असा इशारा मोदी यांनी निवेदना द्वारे दिला आहे.

# सिंदफणा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



माजलगाव । प्रतिनिधी

विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथील जलतरणपटूंनी संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पाच सुवर्णपदके जिंकली आहेत. तसेच विभागीय पातळीवरील ही स्पर्धा सलग तिसऱ्या वर्षी जिंकून हॅट्रिक केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या विद्यार्थ्यांची लातूर येथे १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, विभागीय स्पर्धेत चौदा वर्षांखालील गटातील मुलांच्या ४१०० मीटर फ्रीस्टाइल रिले स्पर्धेत समर्थ गोळेकर, दक्षराज कटारे, आरव भुतडा, अथर्व दुबाळे आणि दीपक भोसले यांच्या संघाने सुवर्णपदक पटकावले. याच स्पर्धेत सतरा वर्षांखालील गटातील मुलींच्या संघात अक्षरा सोळंके, विशाखा सकराते, अनुष्का सोळंके आणि मानसी जगताप यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तसेच ४१०० मीटर मिडले रिले स्पर्धेतही चौदा वर्षांखालील मुलांच्या गटात समर्थ गोळेकर, दक्षराज कटारे, आरव भुतडा, अथर्व दुबाळे आणि अभिनव राठोड यांनी तर सतरा वर्षांखालील मुलींच्या गटात अक्षरा सोळंके, विशाखा सकराते, अनुष्का सोळंके आणि मानसी जगताप यांनी सुवर्णपदके जिंकली. वैयक्तिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. सतरा वर्षांखालील मुलींच्या गटातील अक्षरा सोळंके यांनी ५० मीटर, १०० मीटर आणि २०० मीटर फ्रीस्टाइल या तिन्ही स्पर्धांमध्ये रजत पदके मिळवली. चौदा वर्षे वयोगटातील दक्षराज कटारे यांनी पन्नास मीटर बटरफ्लाय स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला. वॉटर पोलो स्पर्धेतही शाळेच्या संघाने अंतिम सामन्यात देवगिरी महाविद्यालय विरुद्ध ४-३ गोल करून प्रथम स्थान मिळवून सुवर्णपदक जिंकले. एकोणीस वर्षाखालील वॉटर पोलो संघात अभिनव पाणजंजाळ (कर्णधार), आदित्य पाणजंजाळ, मनिष पारवे, कृष्णा डाके, दक्षराज कटारे, गणेश राऊत, समर्थ गोळेकर, अथर्व तौर, आरव भुतडा, राजवीर राठोड, तेजेस सुरवसे आणि अथर्व दुबाळे यांचा समावेश होता.

या स्पर्धेच्या तयारीसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक सचिन मंजुळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी क्रीडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, सचिन मंजुळे व क्रीडा शिक्षिका वैशाली सोळंके यांनी सहकार्य केले. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, शाळेच्या सचिव मंगल सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, देवेंद्र सोळंके, प्रदीप बुरकुल, शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि खेळप्रेमी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेतही हे जलतरणपटू उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे आणि विभागाचे नाव उज्ज्वल करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लबचा मदतीचा हात; अन्नधान्य किट व शालेय साहित्य वाटप




बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीपट्ट्यातील शिरसमार्ग व हिंगणी हवेली गावातील पूरग्रस्तांना पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लब च्या वतीने मदतीचा हात देण्यात आला आहे.. शिरसमार्ग गावातील ४० कुटुंबाला दिवाळीसाठी लागणारा संपूर्ण किराणा भेट देण्यात आला आहे. आज क्लबच्या सदस्यांच्या हस्ते या मदत किटचे वाटप करण्यात आले.. यावेळी प्रमुख उपस्थिती.. क्लबचे सदस्य माजी प्राचार्य हरिदास जोगदंड ,अविनाश पिंगळे खजिनदार ,शिवाजी शिंदे, सतीश बुर्डे ,अरुण बोरकर, संतोष उत्कर, जगन माळी, अभय जोगदंड,सुदर्शन शिंदे, पत्रकार सुरेश महाराज जाधव यांच्यासह गावातील शेकडो लोक उपस्थित होते..

बीडच्या गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग गावाला सिंदफना नदीच्या महापुरामुळे मोठा तडाखा बसला आहे .शेकडो एकर शेती, माती आणि पिके उध्वस्त झाली आहेत. या शेतकऱ्याची व्यथा वृत्तवाहिनीच्या माध्यमातून पाहिल्यानंतर पुणे येथील पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लबच्या सदस्यांनी मदत गोळा केली.. त्या मदतीचे आज शिरसमार्ग गावात वाटप करण्यात आले. मारुतीच्या मंदिरात भाव वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना क्लबचे सदस्यांनी तुमच्या दुःखामध्ये आम्ही सोबत आहोत, तुमचे दुःख पाहिल्यानंतर दिवाळी गोड व्हावी याकरता आम्ही हे फुल नाही फुलाची पाकळी म्हणून मदत करत आहोत ती गोड मानून घ्यावी. असे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन सुरेश जाधव यांनी केले.

यावेळी शेतकऱ्यांना दिवाळीचा सण साजरा करता यावा यासाठी लागणारे किराणा डाळ तेल साखर तांदूळ यासह अन्य किराणातील साहित्य किट तब्बल वीस किलोची किट वाटप करण्यात आली .. यावेळी गावकऱ्यांनी क्लबचे आभार मानले..सिंदफना नदीकाठच्या हिंगणी हवेली गावात नदीचे पाणी शाळेमध्ये गेल्याने अनेक शाळकरी विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य भिजले होते त्यासाठी या क्लबने २५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शाहेद पटेल यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी शिक्षक आणि गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवाळी आली तरीही २९ जिल्ह्यांतील ४१ लाख हेक्टरचे पंचमाने प्रलंबितच

## अहवालास अद्यापही दहा दिवसांची प्रतीक्षा

पुणे : राज्यात अतिवृष्टीमुळे केवळ सप्टेंबरमध्ये तब्बल ४७ लाख हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाले असून याचे पंचनामे करण्याचे काम सध्या सुरू आहे. मात्र, आतापर्यंत केवळ ५ जिल्ह्यांमधील सुमारे ६ लाख हेक्टरवरील नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. त्यामुळे उर्वरित ४१ लाख हेक्टरवरील पंचनामे पूर्ण करण्यासाठी दिवाळीच उजाडणार आहे.


पंचनाम्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुन्हा शासन निर्णय जारी होईल. त्यानंतरच ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. तरीदेखील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मदत देण्यात येईल, असे स्पष्टीकरण कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहे. राज्यात खरीप हंगामात जून ते ऑगस्ट या काळात एकूण २५ लाख ६८ हजार हेक्टरवरील पिके पाण्यात गेली होती, तर केवळ सप्टेंबर महिन्यात तब्बल ४७ लाख ३ हजार ७८१ हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. त्यामुळे एकूण बाधित क्षेत्र ७२ लाख ७१ हजार ७८१ हेक्टर इतके झाले



आहे. त्यासाठी राज्य सरकारने फेब्रुवारी ते ऑगस्ट या काळातील नुकसानीसाठी यापूर्वीच २ हजार ५४२ कोटी रुपयांची मदत जाहीर केली असून त्याचे वाटप सुरू आहे. सप्टेंबरमध्ये तब्बल ३४ जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. अजूनही २९ जिल्ह्यांमधील अहवाल मिळालेले नाहीत. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या म्हणण्यानुसार, काही जिल्ह्यांत शेतांमध्ये पावसाचे पाणी साचून होते. त्यामुळे पंचनामे पूर्ण होण्यास १० दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. साहजिकच अहवाल प्राप्त होण्यासही उशीर होऊ शकतो. हा अहवाल आल्यानंतर महसूल विभागाकडून याचा पुन्हा शासन निर्णय जारी केला जाईल. यात प्रत्यक्ष नुकसान झालेल्या क्षेत्र व मदत याचा उल्लेख केला जाणार आहे. त्यानंतरच मदत जमा केली जाणार आहे. सातारा, कोल्हापूर, हिंगोली, बुलढाणा आणि वर्धा या जिल्ह्यांचेच अहवाल कृषी विभागाकडे प्राप्त झाले. त्यानुसार ५ लाख ९८ हजार ३४६ हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाले आहे. याचा फटका ७ लाख ११ हजार १९८ शेतकऱ्यांना बसला असून जाहीर केलेल्या मदतीनुसार शेतकऱ्यांना ५४२ कोटी ६५ लाखांची मदत मिळणार आहे.

## वांग्यावरील कीड रोखण्यासाठी करा हे उपाय

राज्यातील अनेक भागांमध्ये वांगी लागवड केली जाते मात्र, शेतकऱ्यांना वांग्याचे पीक घेताना, कीड प्रादुर्भावाचा सर्वाधिक सामना करावा लागतो. वांगी लागवड केल्यानंतर प्रामुख्याने शेतकऱ्यांना फळ आणि देठांना छिद्रे पडणाऱ्या अळीचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. ज्यामुळे उत्पादनात घट होऊन, मोठा आर्थिक फटका सहन करावा लागतो. अशावेळी शेतकरी मोठ्या प्रमाणात रासायनिक कीटकनाशकांचा वापर करतात. मात्र, अशा वेळी शेतकऱ्यांनी फवारणी ऐवजी काही उपाय करणे आवश्यक असते.



कशी होते किडींची पैदास?


सामान्यपणे जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात लागवड केल्यानंतर मार्च महिन्यात वांग्यावरील वयस्क मादी किडी ही दुधाळ रंगाची अंडी झाडाच्या पानाच्या खालच्या बाजूने घालते. ज्यामुळे देठ आणि फळे अधिक जवळ असतात. अशावेळी किडींची पैदास वाढीनंतर वांग्याच्या फळावर आणि आणि देठांवर आक्रमण करते. ज्यामुळे ऐन वाढीच्या व फुगवणीच्या अवस्थेत या किडीचा प्रादुर्भाव फळास होऊन, ती फळाला छिद्र पाडते. त्यानंतर प्रामुख्याने त्या छिद्रावाटे जिवाणू आणि बुरशीचा आता फळामध्ये प्रवेश होऊन, ते फळ सडण्यास सुरुवात होते. अशावेळी वांग्यावरील पूर्ण विकसित झालेली ही किडी प्रामुख्याने गुलाबी, भुऱ्या रंगाची असल्याचे पाहायला मिळते.

असे करावे नियंत्रण : प्रामुख्याने शेतकऱ्यांनी वांगी लागवडीनंतर दोन आठवड्यांच्या आत फळधारणा होण्याच्या अगोदरपासून कामगंध सापळे लावण्याची व्यवस्था करावी. ज्यामुळे तुम्हाला कीटकनाशकांवरील खर्च कमी होउन, पिकांवरील प्रभावी कीड नियंत्रण करता येणार आहे. प्रामुख्याने प्रति एकर पिकासाठी कमीत कमी ४ ते ५ कामगंध सापळे लावावेत. गरज पडल्यास प्रति १० मीटर जागेत लावावे. शेतकऱ्यांनी किडींचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी त्याच त्याच जमिनीत पुन्हा पुन्हा वांग्याचे पीक घेण्याची चूक करू नये. शेतातील तण नियंत्रणावर विशेष भर द्यावा.

धने, सौफ यांची लागवड : विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी वांग्याचे पीक घेताना दोन वांग्याच्या बेडमधील जागेत धने किंवा सौफ यांची लागवड करावी. यामुळे कीड नियंत्रणास मोठी मदत होते. किड लागलेले शेंडे दिसून आल्यास अळीसकट नष्ट करावेत. ४० ग्रॅम कार्बारिल किंवा १४ मिली मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के किंवा २.४ मिली सायफरमेथिन, २५ टक्के १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा १० टक्के कार्बारिल भूकटी दर हेक्टरी २० किलो या प्रमाणात झाडांवर धुरळावी.

## घरच्या घरी बनवा अग्नी अस्त्र कीटकनाशक; तणही होईल समूळ नष्ट !

मागील काही वर्षांपासून जैविक पद्धतीने शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला आहे. प्रामुख्याने उच्चभ्रू लोकांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने जागरूकता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतीमध्ये पिकवल्या जाणाऱ्या सेंद्रिय उत्पादित मालाला मोठी मागणी वाढली आहे. परिणामी, आता तुम्ही देखील जैविक पद्धतीने पिकांचे उत्पादन घेत असाल. तर 'अग्नी अस्त्र कीटकनाशक' तुमच्यासाठी शेती करताना वरदान ठरणार आहे. विशेष म्हणजे या कीटकनाशकाच्या वापरामुळे शेतीसाठीचा रासायनिक कीटकनाशकांचा खर्च पूर्णपणे कमी होणार आहे.





कृषी तज्ज्ञांच्या माहितीनुसार, 'अग्नी अस्त्र कीटकनाशक' नैसर्गिक आणि जैविक शेतीमध्ये उपयोग होणारे जैविक कीटकनाशक आहे. या 'अग्नी अस्त्र कीटकनाशकाची' निर्मिती तुम्ही आपल्या आसपास असणाऱ्या घरगुती वस्तूंपासून करू शकतात. हे जैविक कीटकनाशक सर्व नैसर्गिक वस्तूंचा वापर करून अत्यल्प खर्चात बनवले जाते. जे शेतकऱ्यांना नैसर्गिक आणि जैविक करताना एखाद्या दैवी ब्रह्मास्त्र पेक्षा कमी नाही.

'या' रोगांवर आहे गुणकारी : कृषी तज्ज्ञांच्या माहितीनुसार, अग्नी अस्त्र कीटकनाशक हे सर्व प्रकारच्या पिकांसाठी उपयुक्त मानले गेले आहे. यामध्ये फळांना छिद्रे पाडणारी किडी, फळे कुर्तडनारी किडी, पाने खाणारी किडी, देठ कुर्तडनारी किडी याशिवाय देठांना छिद्रे पाडणारी किडी अशा सर्व प्रकारच्या कीड नियंत्रणासाठी अग्नी अस्त्र कीटकनाशक हे खूप उपयोगी ठरते. इतकेच नाही तर या 'अग्नी अस्त्र' खताच्या उपयोगातून तण नियंत्रणासाठी देखील मदत होते. त्यामुळे भाजीपाला शेतीसाठी या अग्नी अस्त्र कीटकनाशकाचा प्रभावी वापर केला जाऊ शकतो. वांग्याची लागवड केल्यानंतर प्रामुख्याने ऐन वाढीच्या कालावधीत पानांवर पांढरा थर जमा झालेला दिसतो. अशावेळी ऐन अंडी स्वरूपात असणाऱ्या किडीवर हे जैविक कीटकनाशक फवारल्यास कीड नियंत्रणात मोठी मदत होते.

असे बनवतात अग्नी अस्त्र कीटकनाशक : अग्नी अस्त्र खाद/कीटकनाशक बनवताना २० लीटर देशी गायीचे गोमूत्र, ५ किलो कडुनिंबाची पाने, ५०० ग्रॅम तंबाखू पावडर, ५०० ग्रॅम तिखट हिरवी मिरची, ५०० ग्रॅम लसूण यांची आवश्यकता असते. तुम्ही प्रामुख्याने गोमूत्रमध्ये बारीक केलेली कडुनिंबाची पाने आणि अन्य सर्व सामग्री मिसळून कमी जाळावर उकळी येईपर्यंत शिजवावे. त्यानंतर उकळलेले हे मिश्रण ४८ तास झाडाच्या सावलीत ठेवावे. आणि दिवसातून दोन वेळा ढवळत राहावे. त्यानंतर एका जाळीदार कापडाने हे मिश्रण गाळून घ्यावे. आणि वापर करताना १०० लीटर पाण्यात १० लीटर 'अस्त्र कीटकनाशक' मिसळून प्रति एकर पिकांवर फवारणी करावी.

## पूर्वहंगामी ऊस लागवड तंत्र

पूर्वहंगामी ऊस लागवड ही जास्त उत्पादन देणारी आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. महाराष्ट्रात ऊस हे नगदी पीक म्हणून ओळखले जाते. उसाची लागवड ही आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरु हंगामात केली जाते. यामध्ये पूर्वहंगामी ऊस लागवड ही उत्पादन व साखर उत्पादनाच्या दृष्टीने सर्वात फायदेशीर मानली जाते. पूर्वहंगामी लागवड साधारणतः ऑक्टोबरच्या शेवटी ते नोव्हेंबर अखेर केली जाते. या काळातील हवामान उसाच्या फुटव्यांच्या वाढीस पोषक असते. योग्य पद्धतीने व्यवस्थापन केल्यास पूर्वहंगामी उसाचे प्रति हेक्टरी सुमारे १५० ते २०० टन पर्यंत उत्पादन मिळविणे शक्य होते. पूर्वहंगामी ऊस लागवड यशस्वी करण्यासाठी जमिनीची पूर्वमशागत, सुधारित जातींची निवड, बेणे प्रक्रिया, खत व्यवस्थापन या सर्व बाबींचे शास्त्रीय पद्धतीने अवलंब करणे आवश्यक आहे. योग्य नियोजन आणि व्यवस्थापनामुळे ऊस उत्पादनात भरघोस वाढ मिळण्यास मदत होते.



पूर्वहंगामी ऊस लागवडीचे महत्त्व : पूर्वहंगामी ऊस लागवड ही शास्त्रीय व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. अधिक ऊस आणि साखर उत्पादन तसेच कारखान्याच्या गाळपाची लवकर सुरुवात या दृष्टीने पूर्वहंगामी लागवडीला जास्त प्राधान्य दिले जाते. हा ऊस १३ ते १४ महिन्यांत म्हणजे नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी या थंडीच्या महिन्यात गाळपास येतो, त्यामुळे या उसाचा साखर उतारा जास्त मिळतो. तसेच पूर्वहंगामी ऊस वेळेत तुटून गेल्यामुळे खोडवा चांगला घेता येतो.

ऊस लागवडीचा कालावधी : पूर्वहंगामी ऊस पिकाची लागवड १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीतच करावी. नोव्हेंबरनंतर लागण झाल्यास थंडीमुळे उसाच्या उगवणीवर विपरीत परिणाम दिसून येतो. व त्यामुळे फुटव्यांची संख्या अपेक्षित येत नाही.

पूर्वमशागत : जमिनीची उभी, आडवी नांगरट करून जमीन भुसभुशीत करावी. पूर्वमशागत खोल आणि चांगली झाल्यास मुळाची वाढ चांगली होऊन अन्नद्रव्ये शोषली जातात. तसेच दर तीन ते चार वर्षांनी एकदा सबसॉयलरचा वापर करावा.

ऊस रोपांची लागवड : सद्यःस्थितीत अति पावसामुळे भारी जमिनीत वापसा लवकर येत नाही. त्यामुळे उसाची रोपे तयार करून रोपांची लागवड करावी. रोपांची लागवड केल्यास फुटव्याची वाढ एकसमान होऊन पक्व उसाची संख्या जास्त मिळते. ऊस लोळणे व पडण्याचे प्रमाण कमी होते. ऊस रोपांची लागण करताना दोन रोपांतील अंतर १.५ फूट, २ फूट किंवा २.५ फूट आणि सरीमधील अंतर ४, ४.५ आणि ५ फूट ठेवता येते.

बेणे निवड : बेणे मळ्यात वाढविलेले ९ ते ११ महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवंशिकदृष्ट्या शुद्ध बेणे वापरल्यास ऊस उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ मिळते. ऊस बेणे लागवड करण्यापूर्वी बेणेप्रक्रिया अवश्य करावी. यामुळे बुरशीजन्य रोग आणि किडीचा बंदोबस्त होतो.

लागवड पद्धत : उसाची लागण मध्यम ते भारी जमिनीमध्ये करताना कोरडी किंवा वाफशावर करावी. हलक्या जमिनीत ओली लागवड करावी. पारंपारिक लागण पद्धतीमध्ये सुधारणा करून मध्यम ते भारी जमिनीमध्ये रुंद सरी पद्धतीने दोन सरींत ४ फूट (१२० सेंमी), ४.५ फूट (१३५ सेंमी), ५ (१५० सेंमी), ५.५० (१६५ सें.मी.) किंवा ६ (१८० सें.मी.) इतके अंतर ठेवता येते. जोडओळ पट्टा पद्धतीने लागवड करताना २.५ फूट बाय ५ फूट (७५ ते १५० सेंमी) किंवा ३ बाय ६ फूट (९० ते १८० सेंमी) याचा अवलंब करावा. लागवड केलेल्या उसात जास्त नांग्या पडल्यास पाण्याच्या पाटात कटाच्या शेजारी जास्त टिपरी लावून त्याचा वापर नांग्या भरण्यासाठी करावा. किंवा लागणी अगोदर पंधरा दिवस प्लास्टिकच्या पिशवीत अथवा पॉली ट्रे मध्ये एक डोळा पद्धतीने रोपे तयार करावेत. लागणीनंतर एक महिन्यात नांग्या भराव्यात.

लागवडीसाठी जाती : पूर्वहंगामी ऊस लागवड करण्यासाठी उसाच्या जास्त साखर उतारा असणाऱ्या आणि जास्त उत्पादन देणाऱ्या सुधारित जातींची निवड करावी. ऊस लागवडीसाठी कोसी ६७१, कोव्हीएसआय ४३४, कोएम ११०८२, एमस १०००१, को ८६०३२, कोव्हीएसआय १८१२१, पीडीएन १५०१२, पीडीएन १५००६, पीडीन १३००७, व्हीएसआय ०८००५, कोएम ०२६५ या जातींचा वापर करावा.

सेंद्रिय खत व्यवस्थापन : पूर्वहंगामी उसामध्ये पहिली फणपाळी देऊन ढेकळे फोडून घ्यावीत. त्यानंतर एकरी ५ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत टाकून रोटाव्हेटरच्या साहाय्याने जमिनीत चांगले मिसळून घ्यावे. त्यानंतर ऊस लागणी अगोदर राहिलेले एकरी ५ टन शेणखत आणि रासायनिक खताचा पहिला हप्ता लागणीच्या सरीमध्ये मातीत मिसळावा. शेणखत किंवा कंपोस्ट खत पुरेसे नसल्यास प्रेसमड केक, कोंबडी खत, कारखान्यावर उपलब्ध असलेले बायोकंपोस्ट, फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर अशा अनेक पर्यायांनी जमिनीमध्ये सेंद्रिय पदार्थ मिसळता येतात. हिरवळीची पिके वाढवून जमिनीत गाडणे हा सेंद्रिय खतांचा पुरवठा करण्यासाठी उत्तम पर्याय आहे.

रासायनिक खतांचा वापर : पूर्वहंगामी हंगामातील ऊस पिकाचा कालावधी हा १३ ते १४ महिन्यांचा असतो. उत्पादकता ही जास्त असल्यामुळे अन्नद्रव्यांची गरज सुद्धा जास्त असते. पूर्वहंगामी ऊस पिकास हेक्टरी ३४० किलो नत्र, १७० किलो स्फुरद व १७० किलो पालाशची वापरण्याची शिफारस आहे. उसासाठी रासायनिक खतमात्रेची शिफारस केली असली तरी माती परीक्षण केल्यानंतर खतमात्रेत योग्य तो बदल करणे गरजेचे आहे. माती परीक्षण केल्यामुळे जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद, पालाश याबरोबरच सूक्ष्म अन्नद्रव्यांची स्थितीची माहिती मिळते. त्यानुसार रासायनिक खतांचे नियोजन करणे सोयीचे होते.

उसाच्या को ८६०३२ या मध्यम उशिरा पक्व होणाऱ्या ऊस जातीस अन्नद्रव्यांची गरज ही जास्त असते. त्यामुळे या जातीस नत्र, स्फुरद आणि पालाशयुक्त खतांची मात्रा २५ टक्के जास्त म्हणजे ४०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व १७० किलो पालाश प्रति हेक्टरी याप्रमाणे द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४६ : अमेरिकन डॉक्टर डॉ. जॉन वॉरेन यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी सर्वप्रथम इथर या रसायनाचा वापर केला.
१८७८ : एडिसन इलेक्ट्रिक लाईट कंपनीचे काम सुरू झाले.
१८८८ : गोपाळ गणेश आगरकरांच्या 'सुधारक' पत्राची सुरूवात
१९१७ : पहिले महायुद्ध जर्मनीसाठी हेरगिरी केल्याबद्दल डच नर्तिका माता हारी हिला पॅरिसजवळ गोळ्या घालून मृत्युदंड देण्यात आला.
१९३२ : टाटा एअरलाइन्सचे पहिले उड्डाण झाले. जे. आर. डी. टाटा यांनी हे विमान कराचीहुन मुंबई येथे आणले व नागरी विमानसेवेची सुरुवात केली. याच कंपनीचे पुढे राष्ट्रीयीकरण होऊन एअर इंडिया ही कंपनी अस्तित्त्वात आली.
१९३५ : टाटा एअरलाइन्सचे पहिले उड्डाण झाले. जे. आर. डी. टाटा यांनी हे विमान कराचीहुन मुंबई येथे आणले व नागरी विमानसेवेची सुरुवात केली. याच कंपनीचे पुढे राष्ट्रीयीकरण होऊन 'एअर इंडिया' ही कंपनी अस्तित्त्वात आली. (व पुढे तिचा बोर्या वाजताना आपण पाहतोच आहे)
१९६८ : हरगोविंद खुराणा यांना नोबेल पारितोषिक प्रदान.
१९७० : अन्वर सदत यांची मिस्त्र देशाच्या राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली.
१९७५ : बांगलादेशातील रहिमा बानू ही २ वर्षांची मुलगी ही देवी रोगाचा शेवटचा रुग्ण ठरली.
१९८४ : आर्च बिशप डेसमंड टुटू यांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर.
१९८८ : उज्ज्वला पाटील ह्या संपूर्ण जगाची समुद्र यात्रा करणाऱ्या पहिल्या महिला बनल्या.
१९९३ : वर्णभेदामुळे निर्माण झालेला अविश्वास दूर करुन, दक्षिण अफ्रिकेत लोकशाही रुजवण्याच्या प्रयत्नांबद्दल अफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसचे नेते नेल्सन मंडेला आणि दक्षिण अफ्रिकेचे अध्यक्ष एफ. डब्ल्यू. डी. क्लर्क यांना शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार जाहीर
१९९७ : भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीला साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'बुकर पुरस्कार' मिळाला.
१९९९ : जागतिक फ्रेड डेव्हिस पुरस्कार भारताच्या गीत सेठी यांना प्रदान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : बादशाह अकबर हिन्दुस्तानचा तिसरा मुघल सम्राट (मृत्यू: १२ आक्टोबर १६०५)
१६०८ : इव्हानजेलिस्टा टॉरिसेली इटालियन गणिती व पदार्थ वैज्ञानिक, हवादाबमापीचा () संशोधक (मृत्यू: २५ आक्टोबर १६४७)
१८८१ : पी. जी. वूडहाऊस इंग्लिश लेखक (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)
१८४१ : जपानचे पहिले पंतप्रधान इटो हिरोबुमी यांचा जन्म.
१९०८ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ एप्रिल २००६)
१९२० : मारिओ पुझो अमेरिकन लेखक (मृत्यू: २ जुलै १९९९)
१९२६ : नारायण गंगाराम सुर्वे कवी (मृत्यू: १६ ऑगस्ट २०१०)
१९३१ : अवुल पाकिर जैनुलब्दीन उर्फ ए. पी. जे. अब्दुल कलाम वैज्ञानिक आणि भारताचे वे११ राष्ट्रपती, एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचे जनक, पंतप्रधानांचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार, पद्मभूषण (१९८१), पद्मविभूषण (१९९०), भारतरत्न (१९९७). राष्ट्रपती होण्यापुर्वी 'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेले ते भारताचे तिसरे राष्ट्रपती आहेत. याआधी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१९५४) आणि डॉ. झाकिर हुसेन (१९६३) या भारतरत्न मिळालेल्या व्यक्ति पुढे राष्ट्रपती झाल्या.
१९३४ : एन. रामाणी कर्नाटिक शैलीचे बासरीवादक
१९४९ : प्रणोय रॉय पत्रकार, एन. डी. टी. व्ही. चे संस्थापक
१९५२ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व छत्तीसगड राज्याचे पूर्व दुसऱ्या क्रमांकाचे मुख्यमंत्री रमण सिंह यांचा जन्मदिन.
१९५५ : भारतीय फील्ड हॉकी खेळाडू कुलबुर भौर यांचा जन्म.
१९५७ : मीरा नायर भारतीय वंशाच्या अमेरिकन चित्रपट निर्मात्या व दिग्दर्शिका
१९६९ : पं. संजीव अभ्यंकर मेवाती घराण्याचे शास्त्रीय गायक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८९ : रामचंद्र विश्वनाथ तथा रामशास्त्री प्रभुणे उत्तर पेशवाईतील प्रामाणिक, निष्पक्षपाती, निर्भीड आणि प्रसिद्ध न्यायाधीश, पुणे दरबारात १५७१ मधे त्यांची शास्त्री म्हणून नेमणूक झाली. थोरले माधवराव जेव्हा पेशवे झाले तेव्हा रामशास्त्री सरन्यायाधीश होते. (जन्म: ? ? १७२०)
१७९३ : फ्रेंच राज्यक्रांती फ्रान्सचा राजा लुई (सोळावा) यांची विधवा पत्नी मेरी अँटोनिएत हिचा गिलोटीनवर वध करण्यात आला.
१८९६ : स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती सेठ गोविंद दास यांचा जन्म.
१९१७ : माता हारी पहिल्या महायुद्धात गाजलेली डच नर्तिका, सौंदर्यवती व गुप्तहेर (जन्म: ७ ऑगस्ट १८७६)
१९१८ : साई बाबा (जन्म:)
१९३० : हर्बर्ट डाऊ अमेरिकन उद्योगपती (जन्म: २६ फेब्रुवारी १८६६)
१९४४ : ओगले काच कारखान्याचे एक संस्थापक गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचे निधन.
१९४६ : हर्मन गोअरिंग जर्मन नाझी (जन्म: १२ जानेवारी १८९३)
१९६१ : सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' हिन्दी साहित्यिक. त्यांनी ४४ ग्रंथ लिहिले. कन्येच्या मृत्यूनंतर त्यांनी लिहिलेल्या 'सरोजस्मृती' या शोकगीताची हिन्दीतील सर्वश्रेष्ठ विलापिकांमध्ये गणना होते. (जन्म: २१ फेब्रुवारी १८९६)
१९८१ : इस्रायली सेना प्रमुख व परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री मोशे दायान यांचे निधन.
२००२ : वसंत सबनीस लेखक व पटकथाकार (जन्म: ६ डिसेंबर १९२३)
२०१२ : कंबोडिया देशाचे पहिले पंतप्रधान नॉरदॉम सिहानोक यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १९२२)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.१४ ऑक्टोबर २०२५ ५

# जालना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या संदर्भात आढावा बैठक

जालना। प्रतिनिधी

आगामी होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची महत्वपूर्ण बैठक आज दि. ११ ऑक्टोबर रविवार रोजी जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात संपन्न झाली . यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राज्य उपाध्यक्ष मधुकर आर्दड, माजी आ. शिवाजीराव चोथे, प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शहा आलम खान , लक्ष्मणराव दळवी, जयमंगल जाधव, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर , महिला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील, धैर्यशील चव्हाण, नितीन जेथलिया, हर्षद बागवान , प्रभाकर घेवंदे, विठ्ठलराव बरकुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणामध्ये जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये तूर्तास महायुतीचा विचार न करता स्वबळावर आपली तयारी ठेवावी, पक्ष



संघटन वाढवावे व पक्ष मजबूत करावा. आपल्या पक्षांमध्ये तीन माजी आमदार व प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असलेले मधुकरराव आर्दड, प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, नितीन जेथलिया व धैर्यशील चव्हाण यांच्यासारख्या तरुणांची ताकद पक्षाला मिळालेली आहे. यामुळे निश्चितच आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला यश मिळणार आहे.

यावेळी माजी आमदार शिवाजीराव चोथे, मधुकरराव आर्दड, रवींद्र तौर, शहालम खान यांच्या सह अनेक पदाधिका-यांची महत्त्व पुर्ण भाषणे झाली. यावेळी सर्व तालुक्याचे तालुकाध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती . यामध्ये शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग,शेख महेमूद, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष मयूर गाडेकर, कामगार आघाडीचे सतीश वाहुळे ,सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हंडे, अमोल खरात, महिला शहराध्यक्ष रिंकल तायड, लक्ष्मणराव कंटुले, संगीता नागरगोजे, मनकर्णा डांगे, सतीश ढवळे, सुरेश सपाटे, कैलास केंधळे, बाबासाहेब घाडगे, दिलीप चव्हाण, प्रताप शिंदे, संदीप राठोड ,संतोष ढेंगळे,उमेश मोहिते, रामभाऊ घोगरे ,बबनराव गाडेकर, प्रभाकर तांबे,रामकिसन मेंढरे, बद्रीनाथ सानप , सचिन संगेकर राहुल काळे कृष्णा गाडेकर , किशोर सवडे, धनराज लहाने , गोरख शिंदे , परमेश्वर कापसे , सिद्धू शिंदे , गणेश डुकरे, संदीप पाटोळे , राहुल हिवराळे , सदाभाऊ शिरसाट, सद्दाम चाऊस, पप्पू खान, समाधान राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सतीश घाटगे यांनी दूर केला श्रीरामनगर वस्तीचा अंधार



अंबड । प्रतिनिधी

गेल्या तेरा वर्षांपासून अंधारात असलेल्या दाढेगाव येथील शेतकरी आणि शेतमजुरांच्या श्रीरामनगर वस्तीमध्ये अखेर प्रकाशाची वात पेटली आहे. भाजपा नेते श्री. सतीश घाटगे यांच्या विशेष प्रयत्नातून येथे ६३ केव्ही क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविण्यात आले असून, यामुळे वस्तीतील वीज पुरवठा सुरू झाला आहे.

भाजपा नेते सतीश घाटगे यांच्या हस्ते रविवारी या नवीन रोहित्राचे लोकार्पण करण्यात आले. वस्तीमित्र श्री. अंगद मिर्दुडे यांनी यासाठी सातत्याने प्रयत्न केले. दाढेगाव येथील श्रीरामनगर वस्तीला गेल्या १३ वर्षांपासून वीज नसल्यामुळे येथील ग्रामस्थ अंधारात जीवन जगत होते. शेवटी श्री. सतीश घाटगे यांनी पुढाकार घेऊन ही वस्ती प्रकाशात आणली. यावेळी, रोहित्र बसविण्यासाठी श्री. राजेंद्र छल्लारे यांच्या माध्यमातून सातत्यपूर्ण पाठपुरावा करणारे श्री. अंगद मिर्दुडे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सतीश घाटगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी समृद्धीचे व्हाईस चेअरमन श्री. महेंद्र मेठी, डॉ. रमेश तारगे, प्रल्हाद जिजा सोळुंके, बाजार समितीचे उपसभापती अरुण घुगे, संचालक केदार राठी, रामेश्वर माने, बाबासाहेब दखने, बंडू मुंडे, प्रेमानंद उढाण, भागवत उढाण, बाळासाहेब नाझरकर, बाबुराव वाळेकर, विजय खटके, नवनाथ डोईफोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरकरांनी सामाजिक उपक्रमांत सहभाग घ्यावा

## आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे आवाहन

अहिल्यानगर। प्रतिनिधी

डेंग्यू हा धोकादायक आजार असून या आजाराची जनजागृती करण्याच्या उद्देशाने महापालिकेकडून शहरात डेंग्यू मुक्त अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानामुळे रुग्णसंख्या कमी करण्यात यश मिळाले आहे. मोबाइलवरील रिल्स पाहण्यात लोकांचा वेळ जातो त्यापेक्षा सामाजिक कामात सहभागी होऊन आपले शहर आरोग्यदायी राहण्यासाठी स्वच्छ अभियान, डेंग्यू मुक्त अभियान, माझी वसुंधरा अभियान यांसारख्या उपक्रमांमध्ये भाग घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

शहरातील मार्केट यार्ड भावनगर येथे डेंगू मुक्त अभियानानिमित्त नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्याची तपासणी आयुक्त यशवंत डांगे यांनी केली. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, सुरेश पठारे, संजय गुगळे, राजकुमार शेटिया, रोहित शिदोरे, स्वाती सूर्यवंशी, जगन्नाथ बोडखे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आदी उपस्थित होते. डेंग्यू मुक्त अहिल्यानगर या अभियानामुळे रुग्णसंख्या कमी झाली आहे, आशा सेविका आरोग्य कर्मचारी व विद्यार्थी यांच्यामार्फत डेंग्यू आजाराची माहिती प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचविण्याचे काम झाले आहे, आयुक्त यशवंत डांगे यांनी सुरू केलेले अभियान कौतुकास्पद असून शासनाच्या योजना फक्त कागदावर न राहता नागरिकांच्या घरापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले पाहिजे ते काम महापालिका करत आहे असे माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी सांगितले. माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, सुरेश पठारे यांनी मनोगत व्यक्त केले.

# २४ केंद्रावर ७८४३ परिक्षार्थींनी दिली पोलिस पाटील भरतीची परीक्षा; जिल्हाधिकाऱ्याची परीक्षा केंद्रावर भेट

जालना। प्रतिनिधी

पोलीस पाटील भरती २०२५ करीता आज पार पडलेल्या परीक्षा केंद्रांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देवून, परीक्षा पारदर्शक व्हावी आणि गैरप्रकार होऊ नये याची पाहणी करून, परीक्षा सुरळीत पार पडेल याची खात्री केली. तसेच परीक्षेच्या तयारीचा आणि व्यवस्थेचा देखील यावेळी आढावा घेतला. जालना जिल्ह्यातील पोलीस पाटील संवर्गाची पदभरतीसाठी जिल्ह्यातील जालना उपविभाग १८५, भोकरदन उपविभाग २४२, अंबड उपविभाग २५१ आणि परतूर उपविभाग २०४ असे एकूण ७२४ रिक्त पदासाठी आज एकुण २४ परिक्षा केंद्रावर लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. आज पार पडलेल्या पोलीस पाटील भरती परीक्षेला ७८४३ परिक्षार्थींनी परीक्षा दिली. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी येथील अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना आणि डॉ. बद्रीनारायण बारवाले, महाविद्यालय, जालना या परिक्षा केंद्रास प्रत्यक्ष भेट देवून



पाहणी केली.पोलीस पाटील भरती २०२५ ही अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने यशस्वीरित्या पार पडावी याकरीता सर्व परिक्षा केंद्रावर बैठे पथक व भरारी पथक यांची नियुक्त करण्यात आले होते. या भरती प्रक्रियेमध्ये सर्व संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, कर्मचारी, पोलीस यंत्रणा व तांत्रिक पथक यांनी उत्कृष्ट समन्वय व कार्यक्षमता दाखवत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यामुळे सर्व परिक्षा केंद्रावर शांततापुर्ण वातावरणात परिक्षा पार पडली. कोणत्याही केंद्रावर अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

# खुलताबाद येथे प्रभागाबाहेरील मतदारांची नावे तत्काळ कमी करा

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नगर परिषद प्रशासनाकडे मागणी

खुलताबाद। प्रतिनिधी

शहरातील नगर परिषद निवडणुकीसाठी १ ते १० प्रभागांतील प्रारूप मतदार यादीत प्रभागाबाहेरील मतदारांची नावे आल्याने मोठा गोंधळ झाला असून प्रभागाबाहेरील मतदारांची नावे कमी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष गजानन फुलारे व पदाधिकाऱ्यांनी रविवारी नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले की, प्रभाग रचना ठरवून दिलेल्या हद्दीतील मतदारांव्यतिरिक्त अन्य प्रभागातील मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात प्रभाग क्रमांक १ ते १० मध्ये आलेली आहेत. त्यामुळे गोंधळ उडाला असून संपूर्ण प्रभागांमध्ये हद्दीनुसार मतदार यादी तयार करून पूर्ण याद्या दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. या वेळी शहराध्यक्ष गजानन फुलारे, शहर कार्याध्यक्ष तौसिफ अहेमद, शेख वाजेद, शेख अदीब, किरण फुलारे आदींची उपस्थिती होती.

# जागतिक बेघर दिन जिव्हाळा केंद्रात उत्साहात साजरा

बीड। प्रतिनिधी

राष्ट्रीय उपजीविका अभियान अंतर्गत, नगर परिषद बीड व रेणुका माऊली सेवाभावी संस्था संचलित ''जिव्हाळा'' शहरी बेघर नीवारा केंद्र,नवी भाजी मंडई, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शहरी जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये दि. १ ऑक्टोंबर २५ ते दि. दि.१० ऑक्टोंबर २५ या कालावधीमध्ये जागतिक बेघर दिनानिमित्त बेघर निवारावासी बांधवांकरिता दहा दिवसीय सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.




या सप्ताहात विविध जीवनावश्यक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात ज्येष्ठ नागरिक दिन, योग व आरोग्य शिबिर, वाढदिवस ,आरोग्य तपासणी शिबिर ,मानसिक आरोग्य तपासणी व मार्गदर्शन, बचत गट मार्गदर्शन, आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या समारोप दिनी दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी सोनाजीराव होमिओपॅथिक महाविद्यालय च्या वतीने डॉ. रिचा साठे व डॉ. माधुरी हाकले यांनी बेघर निवारा केंद्रातील महिला व पुरुषांचे आरोग्य तपासणी करून त्यांना होमिओपॅथिक औषधे देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ .संजय तांदळे, प्रमुख पाहुणे श्री अमोल बडगुजर ,व्यवस्थापक एन यु एल एम विभाग नगर परिषद बीड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिव्हाळा संस्थेचे सचिव अभिजीत वैद्य, कार्यक्रमाचे आभार व्यवस्थापक राजु वंजारे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन काळजी वाहक यश वंजारे ,चद्रंमणी गायकवाड ,छायाताई सरोदे यांनी केले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक सह बेघर निवारा केंद्रातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मायक्रो ओबीसीवर अन्याय झाला तर २४ तास आपल्यासाठी एटीएम मशीन बनायला तयार–आ.केनेकर

अंबाजोगाई। प्रतिनिधी

मायक्रो ओबीसी वर अन्याय झाला तर २४ तास हा संजय केनेकर आपल्या साठी ए टी एम मशीन बनायला तयार आसुन येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात रोहिणी आयोग लागू करावा या प्रमुख मागणी सह आपल्या समाजाच्या समस्ये वर आवाज उठवणार आहे असे अभिवचन विधान परिषदेतील आमदार संजय केनेकर यांनी काढले.भीमराव जगन्नाथ दळे (प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय बलुतेदार-अलुतेदार विकास परिषद यांच्या पुढाकाराने आंबेजोगाई शहरात आयोजित करण्यात आलेल्या मायक्रो ओबीसी चिंतन शिबिरा मध्ये आ. केनेकर हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा महाराज यांचे वंशज प्रवीण जी जानोरकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिनजी साठे, शशिकांत आमणे (संस्थापक अध्यक्ष, बलुतेदार-अलुतेदार संघ.), जानकीराम पांडे (प्रदेशाध्यक्ष, बेलदार समाज संघटना.) यांचे ही मार्गदर्शन लाभणार आहे, बालाजी सिंगे, प्रशांत डोरले, दिलीप सोनवणे, विलास जावळे, कैलास गोसावी, रामेश्वर शिंदे, विजय पोहनेरकर, शुभम डहाके, अनंत उमाटे, विजय देवडे, भुमन्ना अक्केमवाड, मुकेश शिवगण, सुरेश धोत्रे, कैलास गोसावी, अतुल लोहार, सुदर्शन बोराडे, संध्या राजपूत, संजय जोरले कलीम जहांगीर, लक्ष्मण पाटोळे, राजेश पंडित, अक्षय शिंदे यांची प्रमुख उवस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. संजय केणेकर म्हणाले की, फुले शाहू आंबेडकर हे महामानव आमचे दैवत आहे त्यामुळे यांच्या मागे जाणारा समाज हा मायक्रो ओबीसी समाज आहे. तरीही मायक्रो ओबीसी समाजाची किती तरी दिवसा पासून फुले शाहू आंबेडकर यांच्या नावाने आमची बोळवन सुरु आहे. एकाही गोष्टीची मालकी नसलेला, स्वतःच्या संस्था नसलेला समाज म्हणजे मायक्रो ओबीसी समाज. खऱ्या अर्थाने दिन दलित उपेक्षित मायक्रो ओबीसी मधेच सापडतो. मी माझी जात कधी लपवली नाही. माझ्या व्यथा याच माझ्या समाजाच्या आहेत, बारा बलुतेदारांच्या आहेत. मी मायक्रो ओबीसी समाजाचा असताना मुख्यमंत्री मा ना देवेंद्रजी फडणवीस यांनी मला ताकत दिली. मायक्रो ओबीसी वर अन्याय झाला तर २४ तास हा संजय केनेकर आपल्या साठी ए टी एम मशीन बनायला तयार आहे मला वापरा. गोकुळ आष्टमीला इम्तियाज जलील यांनी मांस रस्त्यावर आणले मी त्यांना समजावलं आणि त्यानंतर १० हजार लोक बाहेर काढून कावड यात्रा काढली. ओबीसी मधील बहुसंख्य लोकसंख्या असलेला समाज भाऊ म्हणून आम्हाला कधीही सोबत घेत नाही. रोहिणी आयोग लागू झाला तर आपल्याला न्याय मिळणार आहे. १८ संतांचे वारस आपल्या सोबत आहेत. आजची ही सुरवात आसुन निश्चित या लढ्याला यश मिळेल. यावेळी सचिन साठे, शशिकांत आमणे संध्या राजपूत, विजय देवडे, कैलास गोसावी, अरुण भालेकर, प्रवीणजी जानोरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश पंडित तर सूत्रसंचालन तुकाराम सुवर्णकार यांनी तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश वेदपाठक, संजय तेलंग, सय्यद अमजत भाई, शेख नासिर भाई, महेश वेदपाठक, बबन जंगले, रमाकांत सुवर्णकार, मुनवर भाई बागवान, ज्ञानेश्वर पोतदार आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.५४३/२०२५**

**शेख आलिप लालू विरुद्ध**

**ग्रामपंचायत कार्यालय लोणीघाट**

पहा

शेख आलिप लालू रा. लोणीघाट ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक शेख आलिप लालू चांचा दिनांक ०९/०७/२००६ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस लोणीघाट ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लोणीघाट ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १३/१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १३/१०/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार, बीड**

# हिंगोलीकरांना तीन दिवस निर्जळी; पाणी पुरवठा योजनेचा नॉनरिटर्न वॉल नादुरुस्त

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पाणी योजनेचा नॉन रिटर्न वॉल नादुरस्त झाल्यामुळे शहराला सोमवारपासून ता. १३ तीन दिवस निर्जळीचा सामना करावा लागणार आहे. दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर सुरु करण्यात आले असून नागरीकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. हिंगोली शहराला सिध्देश्वर धरणावरून पाणी पुरवठा केला जातो. शहरातील सर्व सतरा प्रभागांमधून योग्य दाबाने व नियमितपणे पाणी पुरवठा होण्यासाठी पालिका प्रशासनाकडून दक्षता घेतली जाते. प्रत्येक प्रभागात रोटेशननुसार मुबलक पाणी पुरवठा केला जातो.



दरम्यान, हिंगोली शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या सिध्देश्वर धरणाजवळील पाणी पुरवठा योजनेचा नॉन रिटर्नवॉल नादुरुस्त झाले आहे. त्यामुळे पाण्याची गळती वाढली असून शहरातील जलकुंभ भरण्यासाठी मोठा कालावधी लागत आहे. त्यातून पाणी योजनेच्या विद्युतपंप नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सोमवारी ता. १३ सदर प्रकार लक्षात आल्यानंतर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या सुचनेवरून पालिकेचे अभियंता साहेब भुरके, नगर अभियंता प्रतिक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, यांच्यासह पालिकेचे पथक आज दुपारीच तातडीने सिध्देश्वर येथे रवाना झाले असून पालिकेच्या पथकाकडून दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे. दरमयान, सदर दुरुस्तीसाठी तीन दिवसांचा कालावधी लागणार असून त्यामुळे बुधवारपर्यंत (ता.१५) शहराला पाणी पुरवठा होणार नाही. त्यामुळे नागरीकांनी पाणी जपून वापरावे. गुरुवारपासून ता. १६ शहराचा पाणी पुरवठा सुरळीत होणार असल्याचे पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी सांगितले.

# सहलीवर कपडे बदलतानाचा व्हिडिओ काढून विद्यार्थिनीवर शिक्षकाचा अत्याचार

## चौघे ताब्यात; एआयच्या अश्लील फोटोचा धाक दाखवत मुलाकडूनही कुकृत्य

परभणी। प्रतिनिधी

शाळेतील शिक्षकाने सहलीदरम्यान १६ वर्षीय विद्यार्थिनीचा कपडे बदलताना व्हिडिओ काढला. सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केले. याच मुलीचे आणखी एका अल्पवयीन मुलाने एआयची मदत घेऊन अश्लील चित्रीकरण केले. ते व्हायरल करण्याची धमकी दिली. मित्रांसह या मुलाने पीडितेचे शोषण केले. ही घटना परभणी जिल्ह्यात घडली. याप्रकरणी ४ ऑक्टोबर रोजी पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी शिक्षकासह चौघांना ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, संतोष मलसटवाड एका विद्यालयात शिक्षक आहे. शाळेची सहल रायगड आणि महाबळेश्वर येथे गेली होती. यादरम्यान संतोष याने विद्यार्थिनीचा कपडे बदलताना अश्लील व्हिडिओ काढला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केले. दरम्यान, पीडित मुलगी ट्यूशनला गेली असताना एका अल्पवयीन मुलाने त्याच्या मित्रांसह तिथे येऊन तिचा फोटो काढला. हा फोटो एआय तंत्रज्ञानाद्वारे अश्लील करून तो सर्वत्र पाठवून बदनामी करण्याची धमकी दिली. मित्राच्या मदतीने या तरुणाने पीडितेवर अत्याचार केले. मुलीने हे प्रकरण कुटुंबीयांना सांगताच कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे. मुलीच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करीत पोलिसांनी आरोपी शिक्षक संतोष मसलटवाड, अल्पवयीन तरुण व त्याचे दोन मित्र अशा ४ जणांना ताब्यात घेतले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
मंगळवार दि. १४ ऑक्टोबर २०२५ | ६

# जिल्हा परिषद, पंचायत समितीचे आरक्षण जाहीर

## अध्यक्षपद आरक्षित असलेल्या अनुसूचित जाती गटाकडे विशेष लक्ष

### महिलांसाठी ३१ गट राखीव, ओबीसीसाठी १६ तर अनुसूचित जातीसाठी ८ गट, भोगलवाडी अनुसूचित जमातीसाठी राखीव

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती गटाचे आणि गणाचे आरक्षण जाहीर झाले असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा परिषद गटाची आरक्षण सोडत लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आली. यावेळी प्रशासनाचे अधिकारी राजकीय प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील ३१ गट महिलांसाठी राखीव असून यातील सर्वसाधारण महिलांसाठी १९, ओबीसी महिलांसाठी ८ तर अनुसूचित जाती महिलांसाठी ४ गट राखीव आहेत. भोगलवाडी हा एकमेव गट अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे.**





जिल्हा परिषद गट

१) रेवकी:सर्वसाधारण महिला २) तलवाडा : सर्वसाधारण ३) जातेगाव :सर्वसाधारण ४) गढी :सर्वसाधारण ५) धोंडराई :सर्वसाधारण महिला ६) उमापूर : ओबीसी(महिला) ७) चकलांबा:ओबीसी ८) मादळमोही :सर्वसाधारण महिला ९) पाडळसिंगी:सर्वसाधारण १०) केसापुरी : अनुसूचित जाती ११) गंगामसला :ओबीसी १२) टाकरवण :सर्वसाधारण महिला १३) तालखेड :अनुसूचित जाती १४) पात्रुड :सर्वसाधारण महिला १५) दिंद्रुड :सर्वसाधारण महिला १६) उपळी: ओबीसी (महिला) १७) चिखलबीड :सर्वसाधारण १८) राजुरी:सर्वसाधारण महिला १९) बहिरवाडी:सर्वसाधारण महिला २०) पिंपळनेर:सर्वसाधारण २१) नाळवंडी :सर्वसाधारण महिला २२) पाली :सर्वसाधारण महिला २३) नेकनूर: ओबीसी २४) लिंबागणेश :सर्वसाधारण २५) चौसाळा:सर्वसाधारण २६) घाटशिळ पारगाव :सर्वसाधारण महिला २७) रायमोहा :सर्वसाधारण २८) पाडळी: ओबीसी(महिला) २९) पिंपळनेर :सर्वसाधारण ३०) डोंगरकिन्ही: ओबीसी ३१) अंमळनेर :ओबीसी ३२) पारगाव घुमरा:सर्वसाधारण ३३) दौलावडगाव :सर्वसाधारण महिला ३४) धामणगाव:सर्वसाधारण ३५) धानोरा :सर्वसाधारण महिला ३६) लोणी (स) :सर्वसाधारण महिला ३७) कडा :सर्वसाधारण महिला ३८) मुर्शदपुर:सर्वसाधारण ३९) आष्टा ह ना. : सर्वसाधारण महिला ४०) विडा:सर्वसाधारण महिला ४१) येवता :ओबीसी( महिला) ४२) आडस : ओबीसी ४३) होळ :अनुसूचित जाती (महिला) ४४) चिंचोलीमाळी :ओबीसी(महिला) ४५) नांदुरघाट :ओबीसी(महिला) ४६) युसूफवडगाव :सर्वसाधारण

४७) तेलगाव :अनुसूचित जाती (महिला) ४८) भोगलवाडी : अनुसूचित जमाती ४९) आसरडोह :ओबीसी ५०) सिरसाळा :सर्वसाधारण ५१) पिंप्री :अनुसूचित जाती ५२) माडवा (परळी) :सर्वसाधारण महिला ५३) मोहा :अनुसूचित जाती ५४) जिरेवाडी :अनुसूचित जाती (महिला) ५५) धर्मापुरी : ओबीसी ५६)जोगाईवाडी :सर्वसाधारण ५७) घाटनांदूर :सर्वसाधारण महिला ५८) पट्टीवडगाव :सर्वसाधारण ५९) बर्दापुर :ओबीसी(महिला) ६०) चनई : ओबीसी(महिला) ६१) पाटोदा म. :अनुसूचित जाती (महिला)

### माजलगाव पं.स.गण

१)सादोळा सर्वसाधारण महिला, २)केसापुरी आनु.जाती महिला.३) गंगामसला- ओपन,४) आनंदगाव ओबीसी महिला,५)किट्टी आडगाव-ओपन किट्टीआडगाव,६) टाकरवन-ओपन,७)तालखेड- ओपन,८) सावरगाव आनु.जाती खुला,९) पाथ्रुड- ओपन,१०)मोगरा-ओबीसी महिला,११) नित्रुड-ओबीसी,१२)दिंद्रुड–सर्वसाधारण महिला

### गेवराई पं.स.गण

बागपिंपळगाव–सर्वसाधारण, रेवकी–सर्वसाधारण, आंतरवली बु.–सर्वसाधारण, तलवाडा–सर्वसाधारण, जातेगाव–अनुसूचित जाती महिला, रोहितळ–नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) सिरसदेवी–नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) गढी–अनुसूचित जाती, राजपिंपरी–सर्वसाधारण महिला, धोंडराई–सर्वसाधारण महिला, उमापूर–नागरिकांचा मागास प्रवर्ग–महिला, गुळज–सर्वसाधारण, चकलांबा–सर्वसाधारण, बंगाली पिंपळा–नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, कोळगाव–सर्वसाधारण महिला, मादळमोही–सर्वसाधारण महिला, पाडळसिंगी–सर्वसाधारण महिला, रूई–नागरिकांचा मागासप्रवर्ग

### परळी पं.स.गण

१)पांगरी–अनुसुचित जाती महिला २)टोकवाडी–अनुसूचित जाती ३)बेलंबा–सर्वसाधारण ४) नागापूर–ओबिसी महिला ५) सिरसाळा –ओबिसी महिला ६)नंदागौळ–सर्वसाधारण महिला ७) मांडवा–सर्वसाधारण महिला ८)मोहा– सर्वसाधारण ९)पोहनेर–ओबिसी १०) पिंप्री– सर्वसाधारण ११) जिरेवाडी– सर्वसाधारण १२) धर्मापुरी––सर्वसाधारण महिला

### शिरूर कासार पं.स.गण

पाडळी–अनुसूचित जाती सर्वसाधारण राक्षस भवन–ओबीसी सर्वसाधारण, पिंपळनेर –सर्वसाधारण महिला, वारणी– सर्वसाधारण महिला, रायमोहा –सर्वसाधारण, खालापुरी –सर्व साधारण, घाटशीळ पारगाव –सर्वसाधारण महिला, मातोरी –ओबीसी महिला

### धारूर पं.स.गण

भोगलवाडी–सर्वसाधारण, मोहखेड–एससी महिला, जहांगीरमोहा–ओबीसी महिला, धुनक्वड–सर्वसाधारण महिला, तेलगाव–सर्वसाधारण, आसरडोह–सर्वसाधारण महिला

### बीड पंचायत समिती गणाचे आरक्षण

राजूरी नवगण–सर्वसाधारण, कामखेडा–सर्वसाधारण महिला, बहिरवाडी–अनुसूचित जाती महिला, राजुरी घोडका–सर्वसाधारण, पिंपळनेर–सर्वसाधारण महिला, ताडसोन्ना–नामाप्र, नाळवंडी–अनुसूचित जाती, ढेकणमोहा–सर्वसाधारण, पाली–सर्वसाधारण महिला, येळंबघाट–नामाप्र, नेकनूर–सर्वसाधारण महिला, मांजरसुंबा–सर्वसाधारण, चऱ्हाट–नामाप्र महिला, लिंबागणेश–सर्वसाधारण महिला, बोरखेड–नामाप्र महिला, चौसाळा–सर्वसाधारण

### आष्टी पंचायत समिती आरक्षण सोडत

दौलावडगांव गण– ओबीसी सर्वसाधारण महिला, देवळाली गण–सर्वसाधारण महिला, धामणगाव गण–सर्वसाधारण महिला, सुरुडी गण–सर्वसाधारण, डोंगरगण गण–सर्वसाधारण, धानोरा गण –सर्वसाधारण, लोणी स.गण–ओबीसी सर्वसाधारण महिला, टाकळी अमिया गण–सर्वसाधारण महिला, कडा गण– ओबीसी सर्वसाधारण, शिराळ गण–सर्वसाधारण महिला, मुर्शदपूर गण– ओबीसी सर्वसाधारण, पांढरी गण–सर्वसाधारण, आष्टा ह.ना. गण – सर्वसाधारण, पारगाव जो. गण– एस.सी. महिला

### केज पं.स.गण

दहिफळ–सर्वसाधारण, विडा–सर्वसाधारण, उमरी–सर्वसाधारण, येवता–ओबीसी महिला, तांबवा–सर्वसाधारण महिला, आडस–ओबीसी, बनसारोळा–अनुसूचित जाती महिला, होळ–सर्वसाधारण महिला, सोनीजवळा–सर्वसाधारण महिला, युसूफवडगाव–अनुसूचित जाती, वरपगाव–ओबीसी महिला, चिंचोली माळी–सर्वसाधारण, शिरूर घाट–नामाप्रवर्ग ओबीसी, नांदुरघाट–सर्वसाधारण महिला

### पाटोदा पं.स.गण

पारगाव–सर्वसाधार, दासखेड–सर्वसाधारण महिला, सौताडा–अनुसूचित जाती, अंमळनेर–सर्वसाधारण, डोंगरकिन्ही–सर्वसाधारण महिला, पिठ्ठी–ओबीसी महिला

## बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

**आष्टी । प्रतिनिधी**

बिबटच्या हल्ल्यामध्ये आष्टी तालुक्यातील बावी येथील तरुण राजेंद्र विश्वनाथ गोल्हार वय. ३६ यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.या घटनेने परिसरात शोकाचे वातावरण आहे



रविवार दिनांक १२/१०/२०२५ रोजी शेतामध्ये काम करत असताना त्यांच्यावर बिबट प्राण्याने हल्ला केल्याची घटना सायं. ४ ते ४:३० च्या दरम्यान घडली. शेतामध्ये मुलगा बैल चारत होता व वडील बाजूला शेतामध्ये काम करत होते.अंधार पडला तरी शेतात आसलेले वडील का जवळ येत नाहीत हे मुलाच्या लक्षात आले तेव्हा त्याने ग्रामस्थांना सांगितले असता ग्रामस्थांनी शेतामध्ये शोध सुरु केला. या घटनेची माहिती आ.सुरेश धस यांना मिळताच विभागीय वन अधिकारी गर्कळ साहेब, वनपरीक्षेत्र अधिकारी मुंडे साहेब यांना तातडीने सुचना करत सरपंच नवनाथ गर्जे, मा . सरपंच एम.डी लटपटे व २०० ग्रामस्थांसमवेत शोधमोहीम सुरु होती. तेव्हा रात्री १२:१५ च्या दरम्यान उशिरा मृत्यूदेह डोंगरामध्ये आढळून आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालय आष्टी येथे आणण्यात आला आहे.

या दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या कुटुंबाला शासनाची मदत मिळण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यासाठी वन विभाग प्रशासनास आ.सुरेश धस यांनी सुचना केल्या आहेत.बावी , सांगवी पाटण,कोहिनी, बीड सांगवी, डोईठाण, सुरुडी, कारखेल बु, नागतळ, कापशी व पंचक्रोशीत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. कांदा लागवड मोठ्या प्रमाणात चालू आहे शेतकरी यांना शेतीला पाणी देण्यासाठी दिवसा लाईट सोडण्यात यावी सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांनी मागणी केली आहे.

## लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची नगराध्यक्षपदासाठी जोरदार एंट्री ?

### शिवसेनेचे गजानन मुडेगांवकर यांची उमेदवारी चर्चेत !

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लोकशाही व्यवस्थेतील चौथास्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेतील एक धडाडीचे नाव गजानन मुडेगांवकर हे राजकारणात सक्रीय आहेतच पण आता शिवसेने (शिंदे गट)कडून त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी पक्षाकडे उमेदवारी मागितली



असून सर्वसान्याचा उमेदवार म्हणून त्यांची जोरदार चर्चा सध्या अंबाजोगाई शहरात रंगली असून त्यांचे नाव चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. सामाजिक भान, जनतेशी थेट नाळ जोडलेली आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वर्षे सामान्य नागरिकांचे प्रश्न मांडणारे गजानन मुडेगांवकर आता थेट नगराध्यक्ष म्हणून जबाबदारी स्विकारण्याच्या विचारात असल्याचे दिसून येत आहे.

अंबाजोगाई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाची उमेदवारी जाहीर होणे एक महत्त्वाचा भाग असून ते पायाभूत सुविधा, रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, आणि युवकांसाठी रोजगाराच्या ◀◀ पान २ वर

## घुले परिवार पुन्हा रणांगणात; येवता सर्कलमध्ये प्रगती घुले यांच्या नावावर शिक्कामोर्तबाची चर्चा

केज । प्रतिनिधी

येवता जिल्हा परिषद सर्कलमधून पुन्हा एकदा घुले परिवाराचे नाव जोरात चर्चेत आले आहे. ओबीसी महिला राखीव झालेल्या या सर्कलमध्ये भाजपकडून सौ. प्रगती सुरज घुले यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.

लोकनेते मुंडे साहेबांनी रामकृष्ण घुले काकांवर येवता सर्कलची जिल्हा परिषदेची संपूर्ण जबाबदारी दिली होती. रामकृष्ण घुले काकांनी २०१७ पर्यंत या भागात केलेल्या कार्यामुळे भाजपला मजबूत पाया मिळाला. त्यांचा वारसा आता युवा नेते सुरज भैय्या घुले यांनी पुढे नेला आहे. घुले कुटुंबाने नेहमीच स्वच्छ आणि विकासाभिमुख राजकारणाचा आदर्श ठेवला आहे. वृक्षारोपण, लंपी आजारावरील लसीकरण, किर्तन व महाप्रसाद, दसरा मेळाव्याचे भव्य नियोजन, बैलगाडा शर्यत, गावोगावी सामाजिक उपक्रम आणि सर्कलमधील समस्या सोडवण्याचा त्यांचा स्वभाव पाहता मतदारसंघात घुले परिवाराविषयी आदर आहे.

घुले कुटुंबाने काम केलेल्या पूर्वीच्या २० पैकी तब्बल १९ गावांचा पुन्हा समावेश आहे. सौ. प्रगती घुले यांच्या नावानेच भाजप उमेदवारी जाहीर करेल अशी चर्चा सध्या जोरात आहे.

## ओबीसी महाएल्गार सभेस लाखोच्या संख्येने उपस्थित रहा– ॲड.राऊत

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन करण्यात आले असून ओबीसी महाएल्गार सभेला ओबीसी समाज बांधव, भगिनींनी, युवक, युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाएल्गार सभेचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजयजी मुंडे साहेब,माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, ◀◀ पान २ वर

## बऱ्याच कालखंडानंतर कडा शहराला नव्याने पोलीस चौकी मिळणार

### अडीच एकरात होणार नवीन पोलिस ठाणे, निवासस्थान

आष्टी । प्रतिनिधी

दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील याच्या कार्यकाळापासून कडा शहरात चौकीच्या जागी पोलिस ठाणे केले जावे ही शहर वासीयांची मागणी होती. अनेकदा प्रस्तावात तांत्रिक अडचणी येत असल्याने प्रश्न मार्गी लागत नव्हता.

प्रयत्नांना यश मिळेल

मी या मागणीचा पाठपुरावा करत आहे. आमदार सुरेश धस यांनी देखील या संदर्भात पाठपुरावा सुरू केला. असल्याने लवकरच पोलिस ठाणे होईल आणि प्रयत्नाला यश मिळेल, असे कडा शहराचे माजी सरपंच अनिल ढोबळे यांनी सांगितले.

४० गावांतील लोकांची वर्दळ असते कडा येथे झाली असून प्रस्ताव पोलिस ठाण्यातून उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयात पाठवण्यात आला कड्यात आहे. त्यामुळे पोलिस ठाणे होण्याच्या हालचालींनी वेग घेतला

अडीच एकरांत होणार पोलिस ठाणे

आष्टी ठाणे हद्दीतील २८ तर अंभोरा ठाणे हद्दीतील १८ अशा एकूण ४६ गावांचा समावेश होणार आहे. अडीच एकरात पोलिस ठाणे, निवासस्थान व जप्त मुद्देमालांसाठीची जागा असेल. असून अनेक वर्षाच्या मागणीला यश येणार आहे. साधारणपणे अडीच एकरात नवीन पोलिस ठाणे, निवासस्थान व जप्त मुद्देमालांसाठीची जागा असणार आहे आष्टी तालुक्यातील कडा हे बाजारपेठेचे गाव असून दररोज ४० गावांतील लोकांची वर्दळ असते. शाळा, महाविद्यालय, खाजगी क्लासेसमध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनीची मोठी संख्या आहे. राष्ट्रीय महामार्गावरील गांव, बसस्थानक, शहरातून गेलेला रेल्वेमार्ग यामुळे या ठिकाणी पोलिस ठाणे मंजूर करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांतून केली जात होती. आष्टी पोलिस ठाण्याशी संलग्न असेलल्या चौकीच्या जागी स्वतंत्र पोलिस ठाणे उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. प्रस्तावात अनेक वेळा त्रुटी येत असल्याने प्रस्ताव मंजूर होत नव्हता. त्रुटीची पूर्तता करण्यात आली असून प्रस्ताव उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आलेला असून लवकरच पोलिस ठाणे होण्याची शक्यता वाढली आहे.

## डॉ.संतोष कदम यांचा सन्मान समारोह

अंबाजोगाई प्रतिनिधी

दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी मनस्विनी महिला प्रकल्प, अंबाजोगाई येथे, दुबई येथे संपन्न होणाऱ्या मास्टर्स आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी डॉ.संतोष कदम यांची निवड झाली म्हणून डॉ.संतोष कदम सन्मान समितीच्या वतीने सन्मान समारोहाचे आयोजन करण्यात आले होते.



समारोहाची अध्यक्षता सन्मान समितीच्या अध्यक्ष मा. डॉ.अरुंधती पाटील यांनी भूषविली. प्रमुख अतिथी म्हणून मा. चेतनाजी तिडके (अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई), मा.विलासजी तरंगे (तहसीलदार, अंबाजोगाई), मा. डॉ.सिद्धेश्वरजी बिराजदार (स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई), एडवोकेट अजित लोमटे (अध्यक्ष, वकील संघ,अंबाजोगाई), मा.अविनाशजी मुडेगावकर (पत्रकार, दैनिक लोकमत)

## इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांना सुरूवात

### सर्व सभासद डॉक्टर्सनी विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवावा –डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांना सुरूवात झाली असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली. या स्पर्धा केवळ इंडियन मेडिकल असोसिएशनशी संलग्नित असलेल्या सभासद डॉक्टरसाठी आहेत. या स्पर्धा राज्यातील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभासदांसाठी आपले कलागुण दाखविण्यासाठी दर्जेदार राज्यस्तरीय व्यासपीठ असल्याचे मत अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.



या स्पर्धांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रामधून हजारो डॉक्टर्स सहभाग घेऊन आपले कला कौशल्य कलागुण प्रदर्शित करत असतात अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली. या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा,फोटोग्राफी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व रिलस स्पर्धा यांचा समावेश असल्याची माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी दिली. या स्पर्धांकरिता आकर्षक पारितोषिके, सन्मानचिन्ह सन्मानपत्र व राज्यस्तरीय कला महोत्सवात आपली कला सादर करण्याची संधी मिळणार असल्याची माहिती आयोजक राजेश इंगोले यांनी दिली. या स्पर्धा डॉक्टर हे कलाकार असतात त्यांच्या ती विविध कला असतात आणि दैनंदिन आयुष्याच्या ताणतणावातून मुक्त होण्यासाठी या स्पर्धा म्हणजे डॉक्टरांना स्ट्रेस बस्टर आहे असे मत इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संतोष कदम यांनी व्यक्त केले. या स्पर्धा डॉक्टरांना नवचैतन्य, नव ऊर्जा देणारे आहेत यामध्ये प्रत्येक डॉक्टरांनी सहभागी होऊन या स्पर्धेच्या मनमुरादपणे आनंद लुटला पाहिजे असे आवाहन राज्यसचिव डॉ.अनिल आव्हाड यांनी केले. डॉ.राजेश इंगोले यांच्या संकल्पनेतून इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी या स्पर्धा आयोजित करण्यात आलेले आहेत. या स्पर्धा प्रत्येक वर्षागणीस दर्जेदार होत आहेत, ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत्र. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘वेस्ट-टू-एनर्जी प्लांट’ आणि ‘सांडपाणी शुद्धीकरण केंद्रास’ पश्चिम आफ्रिकी देशांतील शिष्टमंडळाची भेट

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या शाश्वत आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची जागतिक स्तरावर

**पिंपरी । प्रतिनिधी**

ग्लोबल ग्रीन ग्रोथ इन्स्टिट्यूट (जीजीजीआय) यांच्या पश्चिम आफ्रिका सिटीवाइड इन्क्लुझिव्ह सॅनिटेशन प्रकल्पांतर्गत आणि सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन तसेच सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल प्लॅनिंग अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्याने ज्ञानविनिमय दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत पश्चिम आफ्रिकेतील सेनेगल, बुर्किना फासो आणि कोट द आयव्हरी या देशांतील शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती केंद्र (वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प) तसेच कॉम्बीट्रीट सांडपाणी शुद्धीकरण केंद्राला भेट दिली. जीजीजीआय सध्या सेनेगल, बुर्किना फासो आणि कोट द आयव्हरी या देशांमध्ये हवामान सक्षमता द्वारे सर्वसमावेशक शहरी स्वच्छता प्रोत्साहन हा प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत महापालिकेच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून, स्थानिक प्रशासनांमध्ये त्या अनुभवांचा उपयोग करण्याचा हेतू या भेटीमागे होता. महापालिकेचे कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती केंद्र आणि कॉम्बीट्रीट सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प हे देशभरातील आदर्श आणि शाश्वत उपाययोजनांचे उत्कृष्ट उदाहरण मानले जातात.



या प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व मन्सूर फॉल (गेट्स फाउंडेशनचे सल्लागार) यांनी केले. त्यांच्या सोबत जेरोम फाख्री (प्रादेशिक तांत्रिक प्रमुख - सर्क्युलर इकॉनॉमी, जीजीजीआय, आफ्रिका विभाग), सिदी का (प्रमुख - तांत्रिक अभ्यास कार्यालय, स्वच्छता संचालनालय, सेनेगल), ज्युलिएन तिअंद्रेबेओगो (महासंचालक - स्वच्छता विभाग, पर्यावरण मंत्रालय, बुर्किना फासो), उस्सेनी ओउएद्राओगो (संचालक - क्षेत्रीय आकडेवारी विभाग, पर्यावरण मंत्रालय, बुर्किना फासो), अद्जुआ हेलेन ब्रागोरी एप्से योकोली (संचालक - शहरी स्वच्छता आणि निचरा विभाग, जलसंपदा मंत्रालय, कोट द आयव्हरी), डायनाबा फाये (प्रमुख - गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण विभाग, राष्ट्रीय स्वच्छता कार्यालय, सेनेगल) तसेच मेरी क्रिस्टिन एमी सेंट फाये (सहयोगी - स्वच्छता विभाग, जीजीजीआय) उपस्थित होत्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्या अधिपत्याखाली चालू असलेल्या कचऱ्याचे व्यवस्थापन, ऊर्जा निर्मिती प्रक्रिया, सांडपाणी शुद्धीकरण तंत्रज्ञान आणि पुनर्वापर उपक्रमांबाबत तसेच मोशी येथील घनकचरा स्थानांतरण केंद्र, प्लास्टिक कचऱ्यापासून इंधन निर्मिती प्रकल्प, बांधकाम राडारोडा गोळा करून प्रक्रिया करण्याचा प्रकल्प (सी अँड डी वेस्ट प्लांट), बायो मेडिकल वेस्ट प्लांट, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी, हॉटेल वेस्ट-टू-बायोगॅस प्रकल्प, बायो मायनिंग प्रकल्प, मेकॅनिकल कंपोस्टिंग प्रकल्प आणि इतर पर्यावरणपूरक प्रकल्पांविषयी सविस्तर माहिती दिली. या भेटीदरम्यान महापालिकेचे उपअभियंता योगेश आल्हाट, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले, सल्लागार स्वरूप लगारे आणि प्रकल्प प्रमुख अशोक गुप्ता तसेच पर्यावरण विभागाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या दौऱ्याचे समन्वयन सीईपीटी विद्यापीठातील सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन संस्थेच्या वरिष्ठ संशोधन सहयोगी ओमकार काणे आणि गौतमी सायमवार यांनी केले. प्रतिनिधीमंडळाने सर्व प्रकल्पांच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त करत महापालिकेच्या शाश्वत शहरी विकासासाठीच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. महापालिकेच्या पर्यावरणपूरक प्रकल्पांची आणि उपक्रमांची स्थानिक प्रशासनामध्ये अंमलबजावणी करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

> पिंपरी चिंचवड महापालिकेचे कचरा व्यवस्थापन, ऊर्जा निर्मिती, शून्य कचरा प्रकल्प यांसारखे विविध पर्यावरणपूरक उपक्रम जागतिक स्तरावर आदर्श ठरत आहेत. या उपक्रमांची दखल आफ्रिकी देशांनी घेतल्याने पिंपरी चिंचवड शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक उज्ज्वल झाले आहे. भविष्यातही पर्यावरण संरक्षण आणि हरित विकासाच्या वाटेवर महापालिका वाटचाल करत राहील.
> विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास या क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. जागतिक स्तरावर या उपक्रमांची दखल घेतली जात असल्याचा आम्हाला अभिमान आहे. हा ज्ञानविनिमय दौरा दोन्ही बाजूंनी अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणणारा ठरला.
> – संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

# निलंबित पोलीस हवालदाराचं कृत्य; महिलेला तब्बल अडीच लाख रुपयांनी फसवले

**पुणे । प्रतिनिधी**

पोलिस हवालदाराने महिलेकडून अडीच लाखांहून अधिक रक्कम आणि सुमारे सहा तोळे सोन्याचे दागिने घेऊन परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी निलंबित पोलिस हवालदार गणेश अशोक जगताप (वय ५२, रा. कावेरीनगर पोलिस वसाहत, वाकड, पुणे) याच्याविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबात कात्रज सुखसागरनगर येथील ४३ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. हा प्रकार डिसेंबर २०१९ ते गुन्हा दाखल होईपर्यंतच्या कालावधीदरम्यान घडला आहे.(डरींशिीं झींपश छ्शुी)




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश जगताप याने फिर्यादी महिलेला डिसेंबर २०१९ मध्ये पत्नीला कॅन्सर झाल्याचे आणि घरच्यांना कोरोनाचा त्रास झाल्याचे सांगत त्यांच्याकडून एक लाख रुपये उधार घेतले. त्यानंतर डिसेंबर २०२० मध्ये पुन्हा आर्थिक अडचणीचे कारण देत फिर्यादी यांच्याकडून सहा तोळे सोन्याचे दागिने गहाण ठेवण्यासाठी घेतले. पुढील काळात मुलीच्या शिक्षणासाठी म्हणून फोनपेच्या माध्यमातून १.५७ लाख रुपये घेतल्याचेही तक्रारीत नमूद आहे. अनेक वेळा मागणी करूनही ना पैसे ना दागिने परत केले. यामुळे अखेर फिर्यादी महिलेने पोलिस आयुक्तालयाकडे आणि नंतर भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, जगताप याच्यावर चतु:शृगी पोलिस ठाण्यात एका महिलेचे ७३ तोळे सोने आणि १७ लाख रुपये रोख घेऊन फसवणूक केल्याचा गुन्हा जुलै महिण्यात दाखल झाला होता. तसेच, पुण्यातील औंध भागात असलेल्या एका सराफी व्यावसायिकाकडून जगताप यांनी सोन्याचे दागिने खरेदी केले होते. त्याबाबत देखील फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. या घटनेमुळे विशेष शाखेचे तत्कालीन पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी जगताप यांचे निलंबन केले होते.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीस ७ वर्षे; सासू, सासऱ्यांना १ वर्षांची शिक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

चारचाकीसाठी माहेरहून पैसे आणण्याचा तगादा लावण्यासह तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा शारिरीक आणि मानसिक छळ करून आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या पतीस सात वर्षे तर सासू, सासऱ्यांना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा न्यायालयाने सुनावली. पती अतुल ठोंबरे, सासू सुषमा ठोंबरे आणि सासरा हनुमंत ठोंबरे (रा. माऊली कृपा बिल्डींग, लेन नं ६, कर्वेनगर) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत.



याखेरीज, पतीस दोन हजार रुपये तर सासू, सासऱ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड न्यायालयाने सुनावला. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही निकालात नमूद करण्यात आले आहे. हि घटना ७ नोव्हेंबर २०११ रोजी सकाळी पावणे अकराच्या सुमारास घडली. याप्रकरणात पोलिसांनी पतीसह सासू, सासऱ्यांविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील प्रदीप गेहलोत यांनी बाजू मांडली. त्यांनी सहा साक्षीदार तपासले. यामध्ये, फिर्यादी व त्यांच्या घरातील अन्य व्यक्तींची साक्ष महत्वाची ठरली. ॲड. गेहलोत यांनी आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करण्याची मागणी केली. न्यायालयाने सरकार पक्षासह बचावपक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत शिक्षा सुनावली.

# कामगारांकडून बेदम मारहाणीत एका चोरट्याचा मृत्यू; ११ जणांवर गुन्हा दाखल

**वाघोली । प्रतिनिधी**

चोरीच्या उद्देशाने भंगार दुकानात घुसलेल्या तिघांना कामगारांनी केलेल्या बेदम मारहाणीमध्ये एका चोरट्याचा मृत्यू झाला. तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले आहेत. ही धक्कादायक घटना सोमवारी पहाटे वडगावशेरी येथील पंतनगरमधील एपीके ट्रेडर्स भंगार दुकानात घडली. या प्रकरणी दुकानमालकासह ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे.



नवाज इम्तियाज खान (वय २६) असे मृत्युमुखी पडलेल्या चोरट्याचे नाव आहे. तर, अन्य दोघे चोरटे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हमीद अफजल अहमद (वय १९, रा. भवानी पेठ, पुणे), आश्रम मेहबूब शेख (वय २६) आणि नवाज इम्तियाज खान (वय २६) हे तिघे चोरी करण्याच्या उद्देशाने भंगार दुकानात घुसले. दुकानातील १० कामगारांनी त्यांना लोखंडी पाइप, स्टील पाइप व पीव्हीसी पाईपने मारहाण करून दुकानात डांबून ठेवले. यानंतर दुकानाचे मालक अहमद महम्मद पुरियाल यांनी येऊन पुन्हा पाईपने तिघांना मारहाण केली. या मारहाणीमध्ये नवाज खानचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच चंदननगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठविले. अहमद महम्मद पुरियाल, मुकेश भगेदी चौरासिया (वय २४), धर्मेश जगराम चौधरी (वय १८), दिलीप कुमार सोमय्या प्रसाद (वय ३२), आकाश निगराय पटेल, गणेश रामलोचन गौतम (वय २०), सूरज रामकिसन सोनी (वय ३३), महेश जग्गू कुमार (वय १९), सुनील रामसेवक कुमार (वय २४), घनश्याम लक्ष्मण चौधरी (वय ४६), जितेंद्र रामलोचन कुमार (वय २५, सर्व रा. वडगाव शेरी) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सीमा ढाकणे करीत आहेत.

# शिरुरच्या ७ जिल्हा परिषद गट आणि १४ पंचायत समिती गणांची आरक्षण सोडत जाहीर

**शिरुर । प्रतिनिधी**

शिरुर पंचायत समितीच्या १४ गणांसाठी दि १३ ऑक्टोबर २०२५ आरक्षण सोडत उत्साहात पार पडली. शिरुर तहसिल कार्यालयातील नवीन प्रशासकीय इमारतीत प्रांताधिकारी विठ्ठल जोशी व तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या उपस्थितीत चिठ्ठी पद्धतीने ही सोडत घेण्यात आली. विशेष म्हणजे या वेळी नागरिक व इच्छुक प्रतिनिधींची उपस्थिती अत्यल्प होती. ज्यामुळे या सोडतीबाबत उदासीनतेचे वातावरण पाहायला मिळाले.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी शिरुर तालुक्यातील स्वयंप्रकाश फरगडे या शाळकरी मुलाच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. पारदर्शक आणि शांत वातावरणात सोडत प्रक्रिया पूर्ण झाली. या सोडतीनुसार २०२५ च्या नव्या लोकसंख्या गणनेनुसार तालुक्यातील अनुसूचित जाती व इतर मागास प्रवर्गाचे प्रमाण विचारात घेऊन आरक्षण निश्चित करण्यात आले. अनुसूचित जातींची लोकसंख्या सर्वाधिक वडगाव रासाई गणात




असल्याने त्या गणाला अनुसूचित जातीचे आरक्षण मिळाले आहे. तर, तालुक्यात अनुसूचित जमातीचे प्रमाण कमी असल्याने या वेळी अनुसूचित जमातीसाठी कोणतेही आरक्षण निघालेले नाही. ओबीसी प्रवर्गासाठी एकूण तीन जागा राखीव ठेवण्यात आल्या असून, त्यापैकी दोन जागा ओबीसी महिलांसाठी व एक जागा ओबीसी सर्वसाधारणसाठी राखण्यात आली आहे. उरलेल्या दहा गणांमधून पाच गण सर्वसाधारण महिलांसाठी आणि पाच गण सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहेत. या सोडतीच्या निमित्ताने आरक्षणाची प्रक्रिया पारदर्शक रितीने पार पडल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले, मात्र इच्छुक उमेदवार व सामान्य नागरिकांनी घेतलेली ‘उदासीन भूमिका’ लक्षवेधी ठरली. पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही सोडत आगामी राजकीय समीकरणांवर काय परिणाम करेल, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

परिषद गटनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे :

१) न्हावरे (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला आरक्षित गट), २) मांडवगण फराटा (नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण आरक्षित गट), ३) तळेगाव ढमढेरे, शिक्रापुर, रांजणगाव गणपती (सर्वसाधारण प्रवर्ग, महिला आरक्षित गट), ४) कवठे येमाई, पाबळ (सर्वसाधारण)

पंचायत समितीचे गणनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे :

१) वडगाव रासाई (अनुसूचित जाती), २) मांडवगण फराटा (ओबीसी महिला), ३) शिरूर ग्रामीण (ओबीसी महिला), ४) न्हावरे (सर्वसाधारण), ५) पाबळ (ओबीसी सर्वसाधारण), ६) केंदूर (सर्वसाधारण महिला), ७) कवठे यमाई (सर्वसाधारण महिला), ८) टाकळी हाजी (ओबीसी महिला), ९) तळेगाव ढमढेरे (सर्वसाधारण महिला), १०) रांजणगाव सांडस (सर्वसाधारण), ११) शिक्रापुर (सर्वसाधारण), १२) सणसवाडी (सर्वसाधारण महिला), १३) रांजणगाव गणपती (सर्वसाधारण), १४) कारेगाव (सर्वसाधारण)

# बंद फ्लॅट फोडून पाच लाखांचा ऐवज लंपास

**नारायणगाव । प्रतिनिधी**

बंद फ्लॅटचा दरवाजा तोडून चोरट्यांनी कपाटातील ४७ ग्रॅम सोन्याचे दागिने, २० हजारांची रोख रक्कम असा सुमारे ५ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. वारुळवाडी ग्रामपंचायत हद्दीतील महाविद्यालय रस्त्यालगत असलेल्या साईधाम सोसायटीमध्ये रविवारी (दि. १२) पहाटे साडेतीनच्या सुमारास हा प्रकार घडला. तो सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.(डरींशिीं झींपश छ्शुी)

सीसीटीव्ही फुटेजवरून दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी नवनाथ नलावडे यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. मात्र, पोलिस ठाण्याच्या सर्व्हरला प्रॉब्लेम असल्याने फिर्याद दाखल झाली नाही. पोलिसांनी फिर्याद दाखल करण्यासाठी नंतर येण्यास सांगितल्याचे नलावडे यांनी माहिती दिली. नवनाथ नलावडे हे साईनाथ सोसायटीमध्ये राहतात. ते फ्लॅटला कुलूप लावून शनिवारी (दि. ११) गावी धोलवड येथे गेले होते. त्यानंतर सोमवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास दोन चोरट्यांनी बंद फ्लॅटचा दरवाजा तोडला. त्यांनी कपाटातील मंगळसूत्र, चैन, कानातील वेल, टॉप आदी ४७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २० हजार रुपये चोरून नेले.

याच सोसायटीतील आणखी दोन बंद फ्लॅटचे कडीकोयंडे तोडून चोरीचा प्रयत्न झाला आहे. मात्र, या फ्लॅटमध्ये कोणी राहण्यास नसल्याने चोरट्यांचा प्लॅन फसला. दरम्यान, आनंदवाडी येथील उज्ज्वला पाटोळे या पादचारी महिलेच्या गळ्यातील १४ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र शनिवारी (दि. ११) सकाळी साडेदहा वाजता दुचाकीवरील आलेल्या चोरट्यांनी लांबविले. पाटोळे यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. काही महिन्यांपूर्वी वारुळवाडीच्या हद्दीमध्ये पोलिस कर्मचाऱ्याच्या घरीच दिवसा चोरी झाली होती. या चोरीचा देखील अद्याप तपास लागला नाही. सध्या नारायणगाव परिसरामध्ये भुरट्या चोऱ्या वाढू लागल्या आहेत. गृहसोसायटीतील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण संपागे यांनी केले आहे.

# गुन्हेगारांना रोखण्यासाठी माझी लढाई-रवींद्र धंगेकर

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड नीलेश घायवळ प्रकरणात शिवसेनेचे महानगरप्रमुख माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी भाजप नेत्यांवर आरोप केल्याने महायुतीतील वातावरण बिघडले आहे. यासंदर्भात शिवसेनेच्या नेत्यांनी धंगेकर यांना समज दिली असली तरी धंगेकर यांनी पुण्यातील गुन्हेगारांना रोखण्यासाठी माझी लढाई सुरु राहील असे सांगत पुन्हा एकदा भाजपसह स्वपक्षीयांना आव्हान दिले आहे.



माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषदेत भूमिका मांडली. नीलेश घायवळला जे लोक पाठीशी घालत आहेत, ज्यांच्यामुळे कोथरूडमध्ये गुन्हेगारी वाढली त्यावर मी बोलत आहे. पुणे शहर भयमुख व्हावे अशी माझी मागणी होती. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा हे त्या भागातील प्रतिनिधी आहेत, त्यामुळे मी प्रश्न विचारत आहे. पण उत्तर न देता भाजपकडून मला ट्रोल केले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला भाजप नेत्यांवर बोलू नका असे सांगितले. पण मी त्यांना सांगितले की मी त्यांच्यावर नाही तर फक्त गुन्हेगारीबाबत प्रश्न विचारत आहे. माझ्या प्रश्नाचं उत्तर देत नाहीये असे सांगितले. मी एक पुणेकर असून पुणेकरांची आवाज म्हणून बोलत आहे. या लढाईत भाजपचा स्वाभिमानी गट मला मदत करत आहे असेही धंगेकर यांनी सांगितले.

# पुणे शहराला नवीन १००० ई-बसेस मिळणार: प्रस्तावाला वेग, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची अवजड उद्योगमंत्र्यांशी चर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

शहरासाठी आवश्यक असणाऱ्या १००० ई-बसेसच्या विषयासंदर्भात आज सोमवारी केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांची नवी दिल्ली येथे भेट घेत सविस्तर चर्चा केली. १००० बसेसच्या मागणीसंदर्भातील पीएमपीएमएलकडून अपेक्षित असणारा प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे दाखल झाला असून याबाबत पुढील प्रक्रिया वेगाने करण्यासंदर्भात कुमारस्वामी यांच्याशी चर्चा करण्यात आली आहे.



पुणे शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था भक्कम करण्याच्या दृष्टीने एकीकडे मेट्रो मार्गांचा आपण विस्तारत करत असताना दुसरीकडे पीएमपीएमएलचे सक्षमीकरण हादेखील आपला प्रमुख अजेंडा आहे. या दृष्टीने या बसेससाठी आवश्यक असणारे पत्र राज्य सरकारने रिझर्व बँकेला प्रस्ताव पाठवावा, याबाबत नुकतीच मोहोळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेतली होती. या भेटीनंतर तातडीने तसा प्रस्ताव रिझर्व बँकेला राज्य सरकारकडून पाठवण्यात आले असून या प्रक्रियेचा पुढील भाग म्हणून पीएमपीएमएलकडून अधिकृत प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे सादर करण्यात आला आहे.

पुणे शहराला १००० बसेस मिळण्याच्या दृष्टीने असणाऱ्या प्रक्रियेला आता गती आली असून ही संपूर्ण प्रक्रिया वेगाने करण्याचा प्रयत्न आहे. या चर्चेवेळी कुमारस्वामी यांनी आपल्या प्रस्तावावर सकारात्मकता दर्शवत पुढील प्रक्रियेसंदर्भात सूचित केले असल्याची माहिती मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे.

# साडूनेच घेतला साडूचा जीव ; आरोपी ३ तासांत गजाआड

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मेहुणीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून साडूनेच साडूचा खून केल्याची धक्कादायक घटना मुंढावरे येथील इंद्रायणी नदीवरील पुलाजवळ घडली. या घटनेत महेश अंभोरे (वय ३५) यांचा खून झाला असून, गुरुनाथ पाटील (वय ३२) या त्याचाच साडूने खून केल्याचे उघड झाले आहे. घटनेनंतर फरार झालेल्या गुरुनाथ पाटीलला लोणावळा पोलिसांनी अवघ्या तीन तासांत कोल्हापूर येथून अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत महेश अंभोरे यांचे लग्न मे २०२५ मध्ये झाले होते. लग्नानंतर त्यांच्या पत्नीचा बहिणीच्या नवऱ्याशी म्हणजेच गुरुनाथ पाटील याच्याशी जवळीक वाढल्याच्या संशयावरून दोघांमध्ये वाद सुरू होते. शुक्रवारी रात्री पुन्हा वाद चिघळल्याने गुरुनाथ पाटीलने महेश अंभोरे यांच्यावर धारदार शस्त्राने वार करत हत्या केली. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी तपास केला असता कोल्हापूर परिसरात तो लपल्याची माहिती मिळाली. सापळा रचून अवघ्या तीन तासांत त्याला अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, लोणावळा शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.